

# राणाची उपाशी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा'वा
दा. क्र. ४७५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार

श्रीसमर्थ-सदन-बाल-प्रकाशन

१३५

# राजाची देणगी

## नि इतर कथा

लेखक

वि. स. गवाणकर

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0104050

मूल्य बारा आणे

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| राजाची देणगी | ... | ... | ३ |
| श्रीमंत | ... | ... | १८ |
| देवाची दया | ... | ... | २३ |
| आनंदाचा आनंद | ... | ... | ३५ |
| गोविंद गोपाळ | ... | ... | ४६ |
| खरां मित्र | ... | ... | ५६ |
| मीरादेवी | ... | ... | ६८ |


[ सर्वाधिकार सुरक्षित ]

पहिली आवृत्ति : १९४५
दुसरी आवृत्ति : १९५२

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

अनुक्रमांक ५०५० ...........
विभाग ..................
क्रमांक .....
नों. दि. ...



सत्यपूर गांवांत एक ब्राह्मण राहात होता. तो सत्यपुरांत भिक्षुकी करी आणि जें कांहीं मिळेल त्यावर स्वतःचा, बायकोचा आणि आपल्या सोळा वर्षांच्या मुलीचा उदरनिर्वाह करी. पण रोजच त्याला पुरेशी भिळकत मिळत नसे, त्यामुळें आजचा दिवस गेला, उद्यांचा कसा जाईल ह्याची चिंता ! आणि ह्या चिंतेंतच आणखी भर म्हणजे मुलीच्या लग्नाची. मुलगी उपवर झालेली. तिचें लग्न करावयासच पाहिजे ना ? पण लग्नाला पैसा कोठून आणावा ? जर कोणा श्रीमंताजवळ पैसा मागावा तर ब्राह्मणाला कोणी देण्यास तयार होईना. कोण देतो बिचाऱ्याला पैसा ? कोणी—कोणी सुद्धा पैशांची मदत करावयास अगर कर्जाऊ पैसे देण्यास तयार होईना.

ब्राह्मणाची बायको म्हणे, म्हणे कसली, तिनें अगदीं टुमणेंच लावलें होतें कीं " यंदा मुलीचं लग्न करायचंच. "

एक दिवस ब्राह्मण दुपारचा जानवीं तयार करीत ओटीवर बसला होता, इतक्यांत सुपांत तांदूळ घेऊन ब्राह्मणाची बायको तेथें आली आणि तांदूळ निवडीत बसली.

तीं दोघें आपापलें काम गप्प बसून करीत होतीं; पण मध्येंच ब्राह्मणाची बायको म्हणाली, “मग यंदा करायचं ना यमीचं लग्न ?”

त्यावर ब्राह्मण म्हणाला, “अग, लग्न केलं पाहिजे हें मला का कळत नाहीं ? पण मी तरी काय करूं ? पैशांशिवाय का ह्या गोष्टी पार पडणाऱ्या आहेत ? कुणाजवळ पैसा मागितला तर नन्नाचा पाढा. मी तरी काय करूं ?”

पण लगेच ब्राह्मणाची बायको म्हणाली, “अहो, आपल्याला काय एका ठिकाणीं नाहीं तर दुसऱ्या ठिकाणीं. देवानें हे असले दिवस दिले आहेत खरे. त्याच्याच मनांतून जर चार ठिकाणीं तोंड वेंगाडायला लावायचं आहे, तर आपण तरी काय करणार ? हे पण दिवस जातील.” असें म्हणून तिनें एक सुस्कारा सोडला.

थोडा वेळ तीं नवरा-बायको कांहींच बोललीं नाहींत.

कांहीं वेळानें ब्राह्मणाची बायको म्हणाली, “ऐकलं का ? मला असं वाटतं कीं...”

“तुला काय वाटतं ?” ब्राह्मण मध्येंच म्हणाला.

“मला असं वाटतं, तुम्ही ब्राह्मण आहांत तेव्हां ह्या देशाच्या राजाकडे जाऊन द्रव्य मागायला कांहींच हरकत नाहीं. राजा फार चांगला आहे असं म्हणतात, तर तुम्ही गेल्यावर तो तुम्हांला रिक्त हस्तानें पाठवणार नाहीं. तुम्ही राजाकडे जावंच असं मला वाटतं.”

“मग मी आजच जाऊं म्हणतेस ?”

“हो. आजच जा ना. आज दिवसही चांगला आहे, सोमवार !”

" अग, पण राजाला जाऊन काय सांगूं मी ? "

"काय सुचेल तें सांगा."

"अग, तूं जसं मला सांगशील तसं मी राजाला सांगेन."

"बरं ! मग राजाला असं सांगा कीं मी ब्राह्मण आहें. गरीब ब्राह्मण आहें. माझी एक मुलगी लग्नाची झाली आहे. तिचं लग्न मला करायचं आहे. मला पैशाची मदत करा."

"अगदीं असंच सांगेन" असें म्हणून ब्राह्मणानें जानवीं तयार करावयाचें साहित्य घरांत नेऊन ठेवलें. पेटींत ठेवलेलें ठेवणीचें धोतर तो नेसला. त्यानें अंगांत बाराबंदी घातली. डोकीला पांढरा स्वच्छ रुमाल बांधला. खांद्यावर पडशी टाकली, हातांत काठी घेतली, पायांत जुने जोडे घातले आणि बिचारा ब्राह्मण पैशांच्या आशेनें राजवाड्याकडे निघाला.

ब्राह्मण मजल दरमजल करीत करीत चालला. त्या काळीं आजच्यासारखे नव्हते तांगे, नव्हत्या सायकली, नव्हत्या मोटरी कीं नव्हत्या आगगाड्या. बैलगाड्या मात्र होत्या, पण बैलगाडींतून जाण्यास पैसे कोठें होते ? फुकटाफुकटीं बैलगाडींतून ब्राह्मणाला कोणीं नेलें असतें का ? म्हणूनच ब्राह्मण चालत चालतच राजवाडा गांठीत होता.

ब्राह्मण तीन दिवसांनीं राजधानींत गेला. राजवाड्याजवळ गेला. राजवाड्याच्या देवडीजवळ गेला.

देवडीवर पहारेकरी बसला होता त्यानें ब्राह्मणाला विचारलें, "भटजी, कोण पाहिजे तुम्हांला ? कुणाला भेटायचं आहे ? "

ब्राह्मण भीत भीत म्हणाला, " पहारेकरीदादा, मला राजाची भेट घ्यायची आहे. होईल का हो राजाची भेट?"

पहारेकऱ्याला ब्राह्मणाच्या ह्या बोलण्यानें काय वाटलें कोण जाणे, पण तो म्हणाला, " थांबा हो भटजी इथेंच. थोड्या वेळांत जाऊन येतों." आणि त्यानें आपल्या जोडीदाराला आपल्या जागेवर बसविलें व आपण राजवाड्यांत गेला.


थोड्याच वेळांत पहारेकरी आनंदित चेहेरा करून बाहेर आला आणि ब्राह्मणाला हसत हसत म्हणाला, " जा, अगदीं सरळ जा. तिथें तुम्हांला महाराज भेटतील."

ब्राह्मणानें आपला पोषाख ठाकठीक आहे अशी हातानें खात्री करून घेतली. मग तो देवडीवरून आंत, राजवाड्यांत गेला व महाराजांना त्यानें नमस्कार केला.

महाराजांनीं ब्राह्मणाला उच्चासन दिलें. नंतर त्यांनीं ब्राह्मणाला विचारलें, " कां आलां आहांत आपण? आपली काय इच्छा आहे?"

महाराजांनीं हे सावकाश पण एकापुढें एक ताबडतोब विचारलेले दोन प्रश्न ऐकून ब्राह्मण थोडासा घाबरला; पण लगेच धैर्य दाखवून तो म्हणाला, " महाराज, मी गरीब ब्राह्मण आहें. माझी मुलगी लग्नाला योग्य झाली आहे. तिचं लग्न ह्या वर्षी केलंच पाहिजे. मी गरीब आहें. माझ्याजवळ पैसा नाहीं. मला पैशांची मदत करा. मी आपली कीर्ति ऐकून आपल्याकडे आलों आहें."

ब्राह्मणाचें बोलणें राजानें ऐकून घेतलें आणि तो ब्राह्मणाला म्हणाला, " ठीक आहे. मी आतां दुसऱ्या कामांत गुंतलों आहें.



माझं काम आटोपतांच मी तुमच्या विनंतीचा विचार करीन. तुम्ही देवडीवर बसा. तिथेंच तुमच्या भोजनाची वगैरे सारी सोय होईल."

ब्राह्मण देवडीवर गेला. त्याला वाटलें, "राजानें विचार करीन म्हणून सांगितलं आहे तर राजा मला कांहींतरी पैसे देणार! नि पैसे हातीं पडलें कीं मग शक्य तितक्या लवकर जाऊन ते पैसे मी बायकोपुढें ठेवीन नि म्हणेन, घे किती पाहिजे तेवढे पैसे. आतां बघ जांवई फक्कडसा नि कर मुलीचं लग्न!"

अशा प्रकारें नाना विचारांत ब्राह्मणाचा देवडीवर एक दिवस गेला. तरी राजानें ब्राह्मणाची चौकशी केली नाहीं.

दुसरा दिवस गेला. तरी ब्राह्मणाची चौकशी झाली नाहीं.

तिसरा दिवस दुसऱ्या दिवसाप्रमाणेंच गेला.

आतां मात्र ब्राह्मणाच्या मनांत काळजी उत्पन्न झाली. राजाला माझी आठवण असेल का? अशी शंकाही ब्राह्मणाला आली.

केव्हां केव्हां ब्राह्मणाला वाटे, "घरीं जावं." पण पुन्हा वाटे, "घरीं जाऊन तरी काय करायचं? आणखी एक दोन दिवस वाट पाहूं नि मग जाऊं घरीं. घरीं केव्हांही जातां येईल. घर आपलंच आहे."

अशा प्रकारें मनाची समजूत करीत ब्राह्मण बसला होता. इतक्यांत कोणीतरी म्हणाला, "ते पाहा प्रधानजी राजवाड्यांत महाराजांच्या भेटीकरितां येत आहेत. भटजी, तुम्ही सांगा प्रधानजींना तुमची हकीकत."

इतकें बोलून संपतें न संपतें तों प्रधानजी देवडीजवळ आलेच. त्यांना ब्राह्मणानें नमस्कार केला आणि आपली हकीकत थोडक्यांत

सांगून महाराजांना आपली आठवण करण्याविषयीं प्रधानजींना विनंति केली.

आणि प्रधानजींनीं राजाला ब्राह्मणाविषयीं आठवण केली. पण राजा म्हणाला, " मी उद्यां ब्राह्मणाची बोळवण करतों हं ! "

उद्यां ब्राह्मणाला कांहीं तरी पैशांची मदत करावयाची म्हणून राजानें त्या रात्रीं काय केलें—

राजानें आपले जरतारी सुंदर-सुंदर कपडे अंगावरून उतरले आणि फाटके तुटके कपडे अंगावर चढविले. डोकीला मुंडासें बांधलें. खांद्यावर घोंगडी घेतली. हातांत वाकडी तिकडी काठी घेतली व तो शहरांत फिरावयास गेला.

राजा कसला गेला फिरावयास ! एक गरीब मजूरच गेला फिरावयास !

हा मजूर फिरतां फिरतां शहराच्या एका टोकाला गेला. तेथें एक लोहार लोखंड तापवून त्यावर घण घालीत होता. भाता ओढावयाचा, लोखंड तापवावयाचें, त्यावर घण घालावयाचे. हें सारें एकट्यानेंच करावयाचें ! बिचाऱ्याची अगदीं त्रेधाच उडत होती.

इतक्यांत हा मजूर तेथें गेला आणि थोडा वेळ उभा राहिला. नंतर तो लोहाराला म्हणाला, " आपणाला मजूर पाहिजे का ? "

लोहारानें लोखंडावर घण घालतां घालतांच, " हो, पाहिजे. " असें म्हटलें.

" मग मला सांगा काम. "

" पण मजुरी काय घेशील ? " लोहारानें लोखंड तापवितां तापवितां विचारलें.

"आपण काय द्याल ती." मजूर म्हणाला.

"बरं, ये तर. धर हा घण नि घाल त्या लोखंडावर!"

मजूर लोखंडावर घण घालण्याचें काम करूं लागला.

लोहारानें आणि मजुरानें सुमारें दोन तास गप्पागोष्टी करीत काम केलें.

काम संपल्यावर लोहारानें मजुराला चार पैसे दिले आणि "असाच केव्हां केव्हां येत जा." असें सांगितलें.

मजुरानें ते चार पैसे तीन वेळां कपाळाला लावले व लोहाराला रामराम करून तो तेथून निघाला आणि—

राजवाड्यांत आला. त्यानें फाटके कपडे वगैरे सारा पोषाख अंगावरून उतरला. नेहमींचा पोषाख अंगावर चढवला आणि मग राजा झोपीं गेला.

राजा सकाळींच उठला. त्यानें सारीं नित्यकर्में आटोपलीं आणि ब्राह्मणाला आपल्या खास बैठकीच्या खोलींत बोलाविलें.

राजाचें बोलावणें येतांच ब्राह्मणाला अत्यानंद झाला. आज चार दिवसांनीं कां होईना पण महाराजांना आपली आठवण झाली! आतां कांहीं तरी मोठी मदत मिळणार! राजाची देणगी—राजा सर्वांपेक्षां मोठा. राजाची देणगी—राजाची मदतही सर्वांच्या मदतीपेक्षां मोठी!

अशा आनंददायक कल्पनेंत डुंबतच ब्राह्मण राजापुढें जाऊन उभा राहिला. त्यानें राजाला वंदन केलें आणि तो मोठ्या आशेनें राजाकडे पाहात राहिला.

राजानें ब्राह्मणाकडे आपादमस्तक पाहिलें आणि हातावर चार पैसे ठेवून घरीं जाण्यास परवानगी दिली.

एक – दोन – तीन – चार !

चारच पैसे हातीं पडलेले पाहून ब्राह्मणाचा सारा आनंद, सारा उत्साह मावळला. साऱ्या कल्पना जमिनीला मिळाल्या. ब्राह्मण अगदीं हिरमुसला झाला. त्याला अतिशय वाईट वाटलें. राजाचा रागही आला. राजाच्या अंगावर हे पैसे फेकून द्यावे असेंही त्याला क्षणभर वाटलें. पण राजानें दिलेले पैसे न घेऊन कसें चालेल ? राजाला राग येईल ना ?

म्हणूनच ते चार पैसे ब्राह्मणानें घेतले आणि निमूटपणें घरची वाट धरली.

ब्राह्मण घरीं चालला होता. त्याचे पाय रस्ता कापण्यांत गुंतले होते. आणि मन ? घरीं गेल्यावर बायको काय बोलेल, तिला काय सांगावें ह्याचा विचार करीत होतें.

पाय आणि मन अशा प्रकारें मजल दरमजल करीत ब्राह्मणासह घरीं आलें.

ब्राह्मण घरीं येतांच बायकोनें विचारलें, "राजानें दिले ना पैसे ? राजा फार चांगला आहे असं मीं ऐकलंच होतं. राजा कांहीं तरी मोठी, मोठी देणगी देणार ! काय दिलं राजानें ? कुठें आहे तें ?"

ब्राह्मण कांहींच बोलला नाहीं. त्यानें डोकीचा रुमाल खुंटीला अडकवला, बाराबंदीच्या खिशांत हात घातला आणि "हं ! ही

पाहा राजानें दिलेली मोठी, मोठी देणगी " असें म्हणत चार पैसे बायकोच्या हातावर ठेवले.

ते चार पैसे पाहून ब्राह्मणाच्या बायकोचा त्याच्यावर विश्वासच बसेना. " माझी थट्टा करूं नका हं. आतां नाहीं खरं सांगितलंत तरी मग तरी सांगालच ना ! " वगैरे तिनें म्हणून पाहिलें, पण " अगदीं खरोखरच चारच पैसे राजानें दिले " असें ब्राह्मणानें सांगितलें तेव्हां मात्र तिच्या अंगांचा तिळपापड झाला. तिला राजाचा अतिशय राग आला. ती म्हणाली, " असला कसला हा मूर्ख राजा. राजानें का चार पैसे द्यावेत ? राजानें का आमची थट्टा करावी ? " ती आणखीही खूप खूप बोलली आणि तिनें ते चार पैसे रागाच्या भरांत भिरकावून दिले व ती आपल्या कामाला निघून गेली !

तो दिवस राजाला वाईट म्हणण्यांत निघून गेला.

दुसरा दिवस उजाडला. ब्राह्मणाची बायको झोपून उठली. अंगणांत गेली तों तिला तेथें काय चमत्कार दिसला ? काल फेकून दिलेले पैसे ज्या ठिकाणीं पडले होते त्या ठिकाणीं तिला चार झाडें उगवलेलीं दिसलीं.


ह्या चार झाडांपैकीं एका झाडाला रुप्याचीं पानें आलीं होतीं.

दुसऱ्या झाडाला माणिकमोत्यांचा मोहोर आला होता.

तिसऱ्या झाडाला सोन्याच्या फुलांचा बहर आला होता. आणि......

चौथ्या झाडाला हिऱ्याचीं फळें आलीं होतीं.

हा सारा चमत्कार पाहून ब्राह्मणाची बायको चकित झाली. काय करूं आणि काय नको करूं असें तिला होऊन गेलें. तिचा



आनंद गगनांत मावेनासा झाला. आतां मुलीचें लग्न राजाच्या मुलाबरोबर करूं कीं प्रधानाच्या मुलाबरोबर करूं हाच प्रश्न तिच्यापुढें उभा राहिला. ती आनंदाच्या भरांत घरांत गेली. तिनें नवऱ्याला हाक मारली. बिचारा ब्राह्मण त्या वेळीं विहिरीवर आंघोळ करीत होता. त्याला ती म्हणाली, " लवकर लवकर आंघोळ आटपा नि इकडे या. अंगणांत काय आहे तें पाहा. अहो, राजा किती चांगला माणूस ! तुम्हीं माझ्या हातावर चार पैसे ठेवलेत तेव्हांच मला वाटलं होतं कीं ह्यांत कांहीं तरी गंमत आहे. "

अशा प्रकारें ब्राह्मण आंघोळ करीत असतां ती बोलण्याचें काम करीत होती. पण तिचें सारें लक्ष अंगणाकडे होतें. नवऱ्याला केव्हां अंगणांत नेऊन तो सारा चमत्कार दाखवीन असें तिला झालें होतें आणि म्हणूनच ब्राह्मणाला तिनें अंगणांत आणलें.

ब्राह्मणानें जेव्हां तीं चार मौल्यवान झाडें पाहिलीं तेव्हां त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळले. जणूं काय अश्रूंच्या रूपानें त्याच्या हृदयांतील चिंता निघून गेली. तो त्या झाडांकडे पाहातच राहिला.

इतक्यांत ब्राह्मणाची बायको म्हणाली, ' अहो, असे बघत उभे काय राहिलांत ? आतां वेळ घालवूं नका. भराभर फुलं तोडा, फळं तोडा, पानं तोडा नि टोपल्यांत भरा. आणा, टोपल्या आणा. "

नंतर ती मुलीला म्हणाली, "अग, तूं उभी काय राहिलीस ? घरांतून टोपल्या आण. जा, लवकर जा. उद्यां तूं राजाची राणी झालीस म्हणजे मग नाहीं कुणी तुला असलीं कामं सांगणार ! "

पुन्हा ती नवऱ्याकडे वळून म्हणाली, " हें काम आटोपल्यावर सोनाराकडे जा. सोनाराला घेऊन या. मला नि माझ्या सोनीला

चार ठसठशीत दागिने करूं द्या. तुम्हांलाही पण एक अंगठी करा; त्यांत हिऱ्याचा झकाससा खडा बसवून घ्या. असावी आपली एखादी अंगठी हातांत!"

नंतर घागर घेऊन ती लगबगीनें विहिरीवर गेली.

विहिरीवर बऱ्याच बायका आल्या होत्या. त्यांना ब्राह्मणाची बायको म्हणाली, "अग बयांनो, आज मला तुमच्याबरोबर बोलायला वेळ नाहीं. मला लवकर गेलं पाहिजे."

त्यावर एक बाई म्हणाली, "कां? आज घाईशी काय?"

"घाई म्हणजे काय घाईच आहे आज! अग, आमच्या घरीं सोन्या-चांदीचीं झाडं उगवलीं आहेत ना! तुम्हांला पाह्यला यायचं आहे का? पाह्यचं असेल तर चला दाखवतें."

चार घरच्या चार बायका ब्राह्मणाच्या घरीं गोळा झाल्या आणि त्यामुळेंच ब्राह्मणाच्या घरची नवलाची गोष्ट हां हां म्हणतां गांवभर पसरली.

"बरं झालं लोकांना कळलं तें! आम्हांला इतके दिवस 'गरीब विचारा ब्राह्मण' म्हणत; पण आतां? आतां गरीब म्हणण्याची कुणाची छाती आहे?...छान झालं चार बायका प्रत्यक्ष पाहून गेल्या तें!" असें ब्राह्मण आपल्या बायकोला म्हणाला.

पण त्यावर मुलीनें शंका काढली. ती म्हणाली, "बाबा, ही बातमी जर राजाला कळली तर तो नाहीं का ही सारी संपत्ति नेणार? मला आपली शंका येते, राजाच्या कानांवर ही बातमी जाईल नि राजा कदाचित् येईल."

"अग हो ग हो; आतां कसं करायचं ?" ब्राह्मण व ब्राह्मणाची बायको एकदमच म्हणालीं. त्या नवराबायकोंना मोठी चिंता पडली. पूर्वी द्रव्य नाहीं, संपत्ति नाहीं म्हणून चिंता; आतां द्रव्य आहे, संपत्ति आहे म्हणून चिंता ! सकाळपासून संध्याकाळ-पर्यंतचा सारा वेळ चिंतेंत गेला. रात्रीं झोपतांनाही त्याविषयीं थोडेंसें बोलणें झालें आणि मग तीं तिघेंही झोपीं गेलीं.

मध्यरात्रींच्या सुमाराला ब्राह्मणाला स्वप्न पडलें. त्याच्या स्वप्नांत राजा आला आणि म्हणाला, " ब्राह्मणा, भिऊं नकोस. हीं सोन्या–चांदीचीं, मोत्या–हिऱ्यांचीं सारीं झाडं तुझीं आहेत. ही सारी संपत्ति तुझी आहे. ह्यावर कुणाचाच हक्क नाहीं. माझ्या प्रजेचा हक्क नाहीं. राजा ह्या नात्यानें माझा हक्क नाहीं. मीं स्वतः कष्ट केले, चार पैसे मिळविले ते तुला दिले. ते खजिन्यांतील नव्हते. प्रजेचा त्यावर हक्क नव्हता. राज्यांतील सारी संपत्ति प्रजेची. त्यावर माझा हक्क नाहीं. खजिन्यावर माझा हक्क नाहीं. खजिन्यांतील संपत्ति मीं स्वतःच्या कष्टानें मिळवलेली नाहीं. त्यावर प्रजेचा हक्क. ते प्रजेचे श्रम. ती प्रजेची आशा. मीं स्वतःच्या कष्टानें मिळवलं तें माझं. माझ्या कष्टाचे चार पैसे तुला दिले. देवाच्या दयेनें आतां एवढी संपत्ति झाली ही तुझी. तूं ही गोळा कर. मुलीचं लग्न कर. भिऊं नकोस. ऊठ. कर ती संपत्ति गोळा. ऊठ!"

ब्राह्मण झोपेंतून जागा झाला. तो उठला. पडलेलें स्वप्न त्यानें बायकोला सांगितलें, तेव्हां बायको म्हणाली,

" पहाटे पडलेलं स्वप्न खरं असतं असं म्हणतात. राजा म्हणजे विष्णूचा अवतार. विष्णु स्वप्नांत आला. देवाची कृपा, विष्णूची कृपा. आपणाला चिंता करण्याचं कारण नाहीं."

हो! खरेंच चिंता करण्याचें कारण नाहीं. आणि खरोखरच त्यांची चिंता नाहींशी झाली. त्यांना आनंद झाला. त्यांनीं आपल्या मुलीचें लग्न मोठ्या थाटामाटानें केलें. राजा सुद्धा त्या लग्नाला आला होता.

म्हातारीं माणसें अद्यापही त्या लग्नसोहळ्याचें वर्णन करतात आणि शेवटीं म्हणतात, "आजपर्यंत तसा लग्नसोहळा कधीं पाहिला नाहीं!"




एक होता राजा. राजाला एकच लाडका मुलगा होता. राजाचें मुलावर फार प्रेम होतें. मुलाचे सगळे हट्ट राजा पुरे करीत असे. राजाच्या मुलानें—राजपुत्रानें—आपणाला सोन्याचा रथ पाहिजे असा हट्ट धरला. राजानें सोन्याचा रथ लगेच तयार करविला आणि राजपुत्राचा हट्ट पुरा केला.

एकदा राजपुत्राला आपल्या सोन्याच्या रथांत बसून राजधानीचें सर्व नगर पाहाण्याची लहर आली. त्यानें आपली इच्छा राजाला सांगितली. राजानें प्रधानजीकडून हुकूम सोडविला,

‘ उद्यां छोट्या महाराजांची स्वारी नगर पाहाण्यासाठीं रथांतून फिरणार आहे. तरी नगरवासी लोकांनीं त्यांचें योग्य प्रकारें स्वागत करावें. ’

राजाचा हुकूम अमलांत आणणारे कांहीं लोक नगरांत होतेच !

दुसऱ्या दिवशीं राजपुत्राचा रथ नगरांत फिरूं लागला.

नगराचा प्रत्येक भाग पाहात पाहात राजपुत्र रथांतून चालला होता. नगरवासी लोक रथावर सुवासिक फुलें उधळीत होते, नमस्कार करीत होते, जयजयकार करीत होते.

तें सर्व पाहून राजपुत्राला वाटलें, नगरांत दिसणाऱ्या घरांचा, लोकांचा, ह्या नगराचा मालक मी! धनी मी!

केवढा अभिमान वाटला त्याला आपल्या ऐश्वर्याचा!

राजपुत्राचा रथ चाललाच होता; तोंच रस्त्याच्या एक कोपऱ्यावर राजपुत्राला एक पोरगा दिसला. तो राजपुत्राच्याच वयाचा होता. तो एका पायानें लंगडा होता. त्याच्या हातांत कथलाची फुटकी वाटी होती आणि तो तोंडानें 'गरिबाला भिक्षा' असें केविलवाणीनें राजपुत्राकडे पाहून ओरडत होता. राजपुत्राच्या पोषाखाच्या उलट—अगदीं उलट—पोषाख त्या भिकारी पोराचा होता. पोषाख हें नांवही त्याला देतां येण्यासारखें नव्हतें. नेसायला फाटक्या सदऱ्याची बनविलेली फाटकी लंगोटी! आणि अंगांत? छे, कांहींच नव्हतें!

राजपुत्राकडे त्या भिकारी पोरानें पाहिलें आणि चेहेरा आशाळभूत केला. डाव्या हातांतील फुटकी वाटी उजव्या हातांत धरून पुढें केली आणि मग 'दादा, गरिबाला भिक्षा' असें तो ओरडला.

राजपुत्रानें त्या भिकाऱ्या पोराकडे एकदा पाहिलें आणि आपल्या हातांतील हिऱ्याची मूठ बसविलेल्या सोन्याच्या काठीकडे पाहिलें.

पण हें सारें क्षणभरच!

राजपुत्राचा रथ चालला—पुढें गेला. तो सोन्याचा रथ त्या पोराच्या दृष्टिआड झाला. दिसेनासा झाला.

मुलाच्या मनांत विचार आले—मी ह्या सोन्याच्या रथांत असतों तर? माझा सोन्याचा रथ! माझे जरीचे छानदार कपडे! आणि



माझी – छे! कल्पनाच नको त्याची. मीं माझ्या सोन्याच्या रथांतून जात असतां एखादा माझ्यासारखा लंगडा भिकारी – ज्याला भीक मागण्यावांचून आपलं पोट भरण्याचं सामर्थ्य नाहीं असा रस्त्यांत भेटता आणि 'गरिबाला भिक्षा' मागता तर?....

...तर हजारों रुपयांची भिक्षा वांटली असती मीं त्याला. पण काय उपयोग आहे माझ्या ह्या विचारांचा?

अशा प्रकारें विचार करतां करतां आणि 'गरिबाला भिक्षा' मागतां मागतां दिवेलावणीची वेळ झाली. आतां 'गरिबाला भिक्षा' मागण्याऐवजीं 'गरिबाला घास' मागण्यास तो निघाला.

त्यानें चार-सहा घरें धुंडाळलीं आणि मिळालेले चार घास खाऊन रस्त्यालगतच्या वडाच्या झाडाखालीं तो गाढ झोपीं गेला.

मीं सकाळीं त्याच रस्त्यानें जात असतां तो भिकारी पोरगा आपणा स्वतःशींच हसतांना मला दिसला. मला वाटलं, ह्या पोराला वेडबीड तर नाहीं ना लागलं? मी त्याला उघड म्हणालोंही,

"काय रे पोरा, स्वतःच हसतोस कां? वेडा तर नाहीं ना झालास?"

तेव्हां तो पोरगा म्हणाला, "काय सांगूं तुम्हांला दादा? रात्रीं मला एक स्वप्न पडलं. त्या स्वप्नाची आतां आठवण झाली म्हणून हसूं आलं."

मग मात्र मी भिकारी पोराच्या जवळ गेलों आणि म्हणालों, "कसलं रे स्वप्न पडलं तुला?"

सांगूं कीं नको, सांगूं कीं नको ह्याचा थोडा वेळ विचार करून भिकारी पोरगा हसला व सांगूं लागला, "पहाटेच्या सुमाराला

मला स्वप्न पडलं. स्वप्नांत मी रत्नजडित सोन्याच्या रथांत बसलों आहें, रथाला पंचकल्याणी आठ घोडे जुंपले आहेत, नगरांतून रथ चालला आहे, नगरवासी लोक रथावर सुवासिक फुलं उधळीत आहेत, नमस्कार करीत आहेत, असं मला दिसलं.

"अशा प्रकारें मी रथांतून जात असतां, काल सकाळीं सोन्याच्या रथांतून जाणारा तो मुलगा—राजपुत्र होता असं मला कळलं—हातांत कथलाची फुटकी वाटी घेऊन 'गरिबाला भिक्षा' असं माझ्याकडे पाहून केविलवाणीनें ओरडत होता. त्याची मला दया आली. मीं माझा सोन्याचा रथ उभा केला नि त्याला द्रव्य दिलं. पोटभर अन्न नि अंगभर वस्त्र अशी सोय केली...आणखी...पण...

"इतक्यांत मी जागा झालों. गाड्यांचा खडखडाट, मोटरींचा घरघराट ऐकूं येऊं लागला. मी डोळे चोळीत चोळीत उठलों. नेसलेल्या फाटक्या फडक्याकडे, भिक्षा मागण्याच्या फुटक्या वाटीकडे पाहिलं. मला हसूं आलं. तोंच तुम्ही आलांत.


"आतां जातों मी 'गरिबाला भिक्षा' मागायला. कुणाला दया आली तर आली."

असें म्हणून तो भिकारी पोरगा चालूं लागला.

मी त्याच्याकडे पाहात उभा राहिलों.

— बालसन्मित्र

♣



फार फार पुराणी गोष्ट. त्या काळीं आजच्यासारखीं राज्यें नव्हतीं. आजच्यासारखे राजे नव्हते. आजच्यासारख्या राण्या नव्हत्या. जो तो आपल्या घरचा राजा. घरची मालकीण हीच राणी आणि प्रत्येकाचें घर हेंच त्याचें राज्य!

त्या काळीं लोक शेतांत मेहनत करीत. धान्य पिकवीत. त्यांचीं गुरांचीं खिल्लारें असत. गुरांना चरण्यास चराई असे. तेथें स्वेच्छेनें गुरें चरत. नदीचें स्वच्छ पाणी. पीत गायी–म्हशी भरपूर दूध देत. लोक दूध–तूप खात. भरपूर मेहनत करीत. स्वच्छ हवा, पौष्टिक आहार, भरपूर मेहनत, चिंता नाहीं, काळजी नाहीं. मग कशाला रोगराई होईल? बहुतेक लोक शतायुषी असत.

त्या काळीं कोणी कोणाचें कांहीं चोरीत नसत. कशाला करणार चोरी? काय जरूरी होती चोरी करण्याची? घरांना कुलपें नसत. कुलूप म्हणजे काय हें कोणाला माहीत सुद्धा नव्हतें. चोरी करण्याची कल्पना निघाली त्यानंतर बऱ्याच दिवसांनंतर कुलुपें तयार करण्याची आणि तीं उपयोगांत आणण्याची कल्पना निघाली असावी!

पण पुढें पुढें लोक स्वार्थ करूं लागले. आपणांजवळ दुसऱ्यापेक्षां अधिक असावें, दुसऱ्याचें आपणांला मिळावें, आपली हुकमत दुसऱ्यावर चालावी, आपण इतरांपेक्षां निराळें असावें असें कांहीं लोकांना वाटूं लागलें. आणि—

अशा स्वार्थी विचारांचीं माणसें टोळ्या करूं लागलीं. निरनिराळ्या विचारांच्या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या बनल्या. त्यांपैकीं कांहीं शक्तिमान होत्या. कांहीं युक्तिमान होत्या. कांहीं स्वार्थी होत्या. कांहीं निःस्वार्थी होत्या. कांहीं दयाळू होत्या. कांहीं निष्ठुर होत्या.

एका विचाराच्या टोळ्या एकत्र झाल्या.

एकत्र झालेल्या टोळ्यांपैकीं एक टोळी दुसऱ्या टोळीवर अधिकार चालवूं लागली.

प्रथम प्रथम अशा टोळ्यांत एकसूत्रीपणा नव्हता. कारण त्यांच्यांत नायकच नव्हता. पण कांहीं दिवसांनीं ते नायक निवडूं लागले आणि पुढें पुढें ह्या नायकांतूनच 'राजा' निर्माण झाला.

असाच एक राजा होता. त्याचें बरेंच मोठें राज्य होतें. राजाला कसला ना कसला तरी छंद असतो. ह्या राजालाही एक छंद होता. तो छंद कोणता? तर राज्यांत जिकडे तिकडे देवळें बांधण्याचा. सर्व राज्यांत शक्य तितकीं निरनिराळ्या आकारांचीं आणि शक्य तितकीं जास्त देवळें बांधण्याचा राजानें जणूं काय संकल्पच केला होता!

हा संकल्प पुरा करण्यासाठीं त्यानें देवळें बांधण्यास सुरुवात केली होती. पण देवळें बांधण्यास राजा पैसा कोठून आणीत असेल

असें वाटतें ? तो प्रजेवर अनेक प्रकारचे कर लादी ! प्रजेवर कर लादावयाचा, जणूं काय त्यांना कराच्या रूपानें दुःख द्यावयाचें आणि देवळें बांधून आपणांस सुख मिळवावयाचें !

राजानें लादलेल्या करांना लोक कंटाळले, त्रासले. लोकांनीं पैशांच्या रूपानें कर द्यावयाचा आणि अंगमेहनतही करावयाची ! राजाच्या मनाप्रमाणें प्रजेनें चाललें पाहिजे. प्रजेला मतच नाहीं, मनच नाहीं असें का राजाला वाटत होतें ? पैशांच्या आणि अंगमेहनतीच्या रूपानें राजानें प्रजेची अगदीं पिळवणूक चालविली होती. राजाचा हुकूम कोणीं पाळला नाहीं तर त्याला राजा फांशीं सुद्धा देई.

अशा ह्या राजाकडे एकदा एक शेतकरी गेला आणि म्हणाला, "महाराज, यंदा माझ्या शेतांत पीक मुळींच नाहीं. सरकारी शेतसारा भरण्याची माझी ऐपत नाहीं. मला यंदाचा शेतसारा माफ व्हावा." पण राजाला शेतकऱ्याची दया आली नाहीं. उलट तो शेतकऱ्यावर रागावला. त्यानें शिपायांकडून शेतकऱ्याला हाकलून दिलें.

पुढें कांहीं दिवसांनीं तो शेतकरी काळजीनें मेला !

आतां कसला शेतसारा राजाला मिळतो ! पण ....

शेतकरी मेल्याची बातमी राजाच्या कानीं गेली. राजा म्हणाला, "शेतकरी मेला कसला, मेल्याचं सोंग केलं असेल. त्यानें मला फसविण्यासाठीं – शेतसारा द्यावा लागूं नये म्हणून – ही युक्ति योजिली असेल. तें कांहीं नाहीं. शेतकरी खरोखरच मेला आहे कीं काय तें पाह्यलं पाहिजे."

म्हणून राजानें नोकरांना शेतकरी मेला किंवा कसें तें पाहून येण्यासाठीं पाठविलें. राजाचे नोकर धावत गेले, धावत आले. त्यांनीं 'शेतकरी खरंच मेला' असें सांगितलें.

राजा म्हणाला, "शेतसारा चुकविण्यासाठींच शेतकरी मेला. पण शेतकऱ्या, हें लक्षांत ठेव, तूं मेलास तरी शेतसारा मी तुझ्याजवळून वसूल करीन."

नंतर तो नोकरांना म्हणाला, "अरे, जा लवकर नि शेतकऱ्याच्या प्रेतावर लाथा मारा. असं करूं लागलां कीं कुणाला तरी दया येईल नि तो तुम्हांला विचारील, कां मारतां त्याला? काय केलं होतं त्यानें? मग सरकारी कर त्या माणसाकडे मागा. त्याला दया येईल नि तो शेतकऱ्याचा कर देईल. जा. लवकर जा. कर वसूल कराच! देवळं बांधण्यास पैशांची जरुरी आहे."

राजा म्हणजे देव. देव का आपल्या लेकरांना त्रास देतो? दुःख देतो? पण आमचा हा राजा?

लोक कंटाळले. त्रासले. लोकांनीं देवाचा धावा चालविला. ये ये. देवा ये. आमच्या राजाला सद्‌बुद्धि दे. आमचा छळ थांबव. ये ये. देवा ये!

पण देवानें लोकांच्या हाकेला 'ओ' दिली नाहीं. देव धावून आला नाहीं. देव पावला नाहीं. कां बरें देव धावून आला नाहीं? तो राजाच्या अपराधांची संख्या मोजण्यांत का गुंतला होता? का राजाला कोणती शिक्षा द्यावी ह्याचा विचार करीत बसला होता?

लोक देवाचा धावा करीतच होते.

राजा लोकांना दुःख देतच होता.

असे बरेच दिवस गेले. पण आतां...

दुष्काळ पडला. पाऊस नाहीं. पाणी नाहीं. शेती नाहीं. पीक नाहीं. लोक उपाशी मरत आहेत. शेतांत पाणी नाहीं म्हणून डोळ्यांतून पाणी काढीत आहेत. मरतां मरतां देवाचें नांव घेत आहेत. देवाला हाका मारीत आहेत आणि राजा राज्यांत देवळें बांधण्यासाठीं नवीन नवीन कर बसवीत आहे. देवळें बांधण्यास सक्तीनें लोकांना नेत आहे!

असेंच एकदा एक शंकराचें प्रचंड देऊळ बांधण्याचें काम चाललें होतें. राजा स्वतः जातीनें तेथें हजर होता. लोक आनंदानें, उत्साहानें नव्हे तर राजाच्या भीतीनें, शिक्षेच्या भीतीनें भराभर काम करीत होते.

अशा वेळीं एक पन्नास पंचावन्न वर्षांचा बैरागी राजापुढें येऊन उभा राहिला. बैराग्याचा आनंदी, हसरा चेहेरा, तेजस्वी डोळे, प्रकाशमय कान्ति आणि ह्या सर्वांना शोभा देणारी पांढरी शुभ्र दाढी पाहून राजाला क्षणभर वाटलें, हा बैरागी कीं देवदूत?

बैरागी राजापुढें येऊन उभा राहिला. त्यानें 'जय भोलानाथ' अशी आरोळी दिली आणि तो बोलूं लागला,

"महाराज, मी बैरागी आहें."

"मला दिसतं आहे. पण तुझं म्हणणं काय?" राजा.

"कांहीं तरी दान द्या. कांहीं तरी पोटाला द्या." बैरागी.



"अरे, राज्यांत दुष्काळ पडला आहे. पाऊस नाहीं, पाणी नाहीं. लोकांना खायला अन्न नाहीं. तूं फुकट खायला मागतोस! काम करावं. कष्टानें मिळवावं, खावं. वैराग्या, हें पाहा देवळं बांधण्याचं काम चाललं आहे. तूं काम करायला लाग. पोटाला थोडं फार मिळेल नि सहजासहजीं पुण्यही पदरीं पडेल."

त्यावर वैरागी म्हणाला, "महाराज, माझ्या पदरीं पुण्य पडणार नाहीं. उलट मी पापाचा मात्र धनी होईन. आपण देवळं बांधीत आहांत म्हणूनच राज्यांत पापाचे पर्वत निर्माण झाले आहेत नि ह्या पापाच्या पर्वतांमुळेंच बाहेरून येणारे पावसाचे ढग अडले जातात. कदाचित् एखादा पाण्यानें भरलेला ढग चुकून आलाच तर लोकांच्या दुःखाच्या उष्ण सुस्काऱ्यानें त्याची पुन्हा वाफ होऊन जाते नि म्हणूनच राज्यांत पाऊस पडत नाहीं."

"वैराग्या, काय म्हणतोस? मी कोण आहें हें तुला अद्याप माहीत नाहीं?" राजानें रागानें लाल डोळे करून वैराग्याला विचारलें.

"महाराज, रागावूं नका. राजाला राग नसावा. त्याच्या अंतःकरणांत दया असावी. त्याचं हृदय लोण्यापेक्षांही मऊ असावं. महाराज, हा वैरागी बोलतो आहे हें अगदीं खरं आहे." वैरागी शांत चित्तानें राजाला म्हणाला.

आपल्या बोलण्याचा परिणाम वैराग्यावर न होतां हा वैरागी आपल्यालाच उपदेश करतो ह्याचें राजाला नवल वाटलें आणि थोडासा रागही आला.

थोडा वेळ राजा बैराग्याकडे पाहात राहिला. नंतर तो बैराग्याला म्हणाला, " बैरागीबाबा, मी तुम्हांला शिक्षा करीन ह्याची भीति नाहीं का वाटत ? "

बैरागी हसत म्हणाला, " नाहीं ; महाराज, मला आपली भीति कां वाटावी ? जो भीतीची पर्वा करीत नाहीं, सत्य सांगतो, सत्य बोलतो तोच माझ्यासारखा बैरागी. "

" मग तूं सांगतोस तें सत्य आहे काय ? माझ्या हातून पापाचे पर्वत निर्माण होत आहेत काय ? " राजानें बैराग्याला विचारलें.

" होय. महाराज, मी सांगतों तें सत्य, अगदीं सत्य आहे. " बैरागी म्हणाला.

" तर मीं काय केलं असतां पुण्य लाभेल ? मीं काय केलं असतां राज्यांत पाऊस पडेल ? दुष्काळाऐवजीं सुकाळ होईल ? " राजा अगदीं गंभीरपणें म्हणाला.

" महाराज, जर मी सांगेन तसं कराल तर आपल्या राज्यांत पाऊस पडेल. सुकाळ होईल. "

" नि नाहीं झाला तर ? पाऊस नाहीं पडला तर ? "

" तर मला वाटेल ती शिक्षा करा ! "

" जर पाऊस पडला नाहीं तर, बैरागीबुवा, तुम्हांला फांशीची शिक्षा ! आहे कबूल ? "

" महाराज, मी आनंदानें फांशीं जाईन. "

" बरं, ठीक आहे. चला माझ्याबरोबर. " असें म्हणून बैराग्यासह राजा राजवाड्यांत आला.

राजा आणि बैरागी! राजवाड्यांतील माणसांना ह्या दोघांची संगत पाहून आश्चर्य वाटलें. पण ह्या आश्चर्याहून दुसऱ्या दिवशीं आणखी एक आश्चर्य!

"प्रजेवर जे नवीन नवीन कर बसविले होते ते ते आजपासून उठविले आहेत. ह्यापुढें प्रजेजवळून कर घेतले जाणार नाहींत. देवळं बांधण्यास सक्तीनें नेलं जाणार नाहीं." राजानें अशी दवंडी जिकडे तिकडे वाजविली.

आणखी किती तरी पूर्वींच्या जुलमी योजना राजानें बंद केल्या.

आतां प्रजेच्या तोंडावर आनंदाची छटा दिसूं लागली. त्यांचीं हृदयें आनंदानें फुलूं लागलीं. प्रजा म्हणूं लागली, "राजा असावा तर असाच असावा. देवा, आमच्या राजाला उदंड आयुष्य दे. आमच्या राजाला सद्बुद्धि दे!"

प्रजा देवाची प्रार्थना करूं लागली. झुंडींनीं, थव्याथव्यांनीं आकाशाकडे टक लावून पाहूं लागली.

"देवा, आमच्या राजाला सद्बुद्धि दिलीस. आमच्यावर दया केलीस. आम्हांला पावलास. तशी आतां आणखी दया कर. आणखी पाव. पाऊस पाड."

अशा प्रकारें एक दिवस प्रार्थना केली तरी पाऊस नाहीं. दोन दिवस, तीन दिवस झाले.

दहा दिवस झाले पण पाऊस नाहीं.

आज राजानें बैराग्याला विचारलें, "काय बैरागीबुवा, पाऊस पडत नाहीं. आतां आणखी किती दिवस वाट पाह्यची?"

"आणखी पांचच दिवस! महाराज, पांच दिवस वाट पाहा. माझ्यावर विश्वास असूं द्या." बैरागी म्हणाला.

"बरं. पांच दिवसांनंतर आपणांला फांशीं जावं लागेल." राजा म्हणाला.

"कांहीं हरकत नाहीं." बैरागी हसत म्हणाला.

लोक देवाची प्रार्थना करीतच होते. त्यांचे डोळे आकाशाकडे लागलेले होते. ते देवाचा धावा करीत होते.

आज राजानें बैराग्याला सांगितलें, "बैरागीबुवा, आज चार दिवस झाले. आतां एकच राहिला. उद्यांपर्यंत पाऊस पडला नाहीं तर आपणाला फांशीं जावं लागेल. आपली तयारी आहे ना? उद्यां फांशीं जायला तयार व्हा."

"कांहीं हरकत नाहीं महाराज." बैरागी हसत हसत म्हणाला.

आज पांचवा दिवस. आज पांच वाजतां बैराग्याला फांशीं द्यावयाचें. आतां अवघे दहा तासच राहिले. दहा तासांनीं?

पण काय चमत्कार! ते पाहा आतांच आकाशांत काळसर ढग जमूं लागले. ते पाहा. ते पाहा. आतां आशा वाटूं लागली. पाऊस पडेल.

आणि अगदीं खरेंच. हजारों, लाखों लोकांची इच्छा, लाखों प्राण्यांची इच्छा देवानें पुरी केली.

सर सर पावसाच्या धारा पडूं लागल्या. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. लोकांचीं हृदयें ओलीं झालीं. चेहेरे टवटवीत झाले. झाडें–झुडपें टवटवीत झालीं. गुरां-वासरांचीं हृदयें शांत झालीं.

राजाला आनंद झाला. नवलही वाटलें. तो धावतच वैराग्याकडे गेला आणि त्यानें वैराग्याचे पाय घट्ट धरले. त्याच्या पायांवर आपलें डोकें ठेवलें. राजाचा कंठ दाटून आला. तो वैराग्याला म्हणाला, " महाराज, वैरागीमहाराज, आपण कोण आहांत ? देव आहात का ? सांगा. आपलं खरं स्वरूप दाखवा. "

वैराग्यानें राजाच्या पाठीवरून हात फिरविला आणि मग तो राजाला म्हणाला, " राजा, वाईट वाटून घेऊं नकोस. तूं आजपर्यंत खऱ्या देवाला ओळखत नव्हतास. देवळं बांधून निर्जीव दगडांना त्यांत ठेवीत होतास. राजा, दगडाचा देव होत नाहीं. दगड तो दगड ! दगडांना तूं भजत होतास. दगडांकरितां राज्यांतील सारी संपत्ति खर्च करीत होतास. खऱ्या देवांना दुःख देत होतास. राजा, खरे देव हे लोक आहेत, ही प्रजा आहे. त्यांची सेवा ही खरी सेवा. त्यांचीं घरं हीं खरीं देवळं आहेत. तूं खऱ्या देवांना छळलंस. त्यांना दुःख दिलंस. त्यांच्यावर नाना कर लादलेस. त्यांचीं हृदयं जाळून टाकलींस. म्हणूनच पाऊस पडेना. म्हणूनच दुष्काळ पडला. पण आतां...

" तूं खऱ्या देवांना ओळखलंस. तुला खऱ्या देवाची जाणीव झाली. म्हणूनच हा पाऊस पडला. म्हणूनच हा अमृताचा वर्षाव झाला. नवजीवनाच्या धारा आल्या. लोकांत नवजीवन उत्पन्न झालं. "

राजानें वैराग्याचे पाय पुन्हा धरले. पायांवर डोकें ठेविलें आणि तो म्हणाला, " वैरागीमहाराज, आपण मला नवी दृष्टि दिलीत. चुकलेल्या मार्गावरून वळवलंत. ज्ञानाच्या दिव्याच्या प्रकाशानें

योग्य मार्गाला लावलंत. महाराज, मला क्षमा करा. म्हणा, राजा, तुला क्षमा केली आहे."

"राजा, तुला क्षमा केली आहे. आतां एकच गोष्ट सांगतों ती लक्षांत ठेव. तुझ्या प्रजेच्या दुःखाच्या अश्रूंमुळेंच समुद्र बनले आहेत नि पुन्हा तूं प्रजेला सुखी केलंस म्हणून त्या अश्रूंपासून, समुद्राच्या पाण्यापासून पाऊस निर्माण झाला आहे. दुःखांतून सुख!"

असें सांगून वैरागी तेथून निघाला. गेला!

वैरागी क्षणांत कोठें गेला. क्षणांत कोठें नाहींसा झाला. वैरागी कोठें गेला? तो देव कोठें लपला?

राजाला वाईट वाटलें. पण आपली प्रजा सुखी झाली, आनंदानें—सुखानें नांदूं लागली हें पाहून राजाला आनंद झाला. आतां राजा आनंदांत आहे!

♣



# आनंदाचा आनंद

'आई, मला साडेपांचला उठव ग' हें वाक्य मी दररोज रात्रीं साडेदहाला ऐकत असतों. आमच्या शेजारीं, म्हणजे शेजारच्या खोलींत आनंदा आपल्या आईला झोपते वेळीं सांगत असतो.

आनंदानें साडेपांच वाजतां डोळे चोळीत चोळीत उठावयाचें. चूल भरावयाची. खुंटीची टोपी डोकीला अडकवावयाची आणि स्टेशनवर धूम ठोकावयाची ! आणि ही सारी धडपड कशाकरतां तर पांच रुपयांकरितां !

तसें म्हटलें तर ह्या पांच रुपयांऐवजीं आनंदाला सबंध दिवस खपून पंचवीस रुपये मिळवितां आले असते; पण केवळ ध्येय गांठण्यासाठींच ह्या पांच रुपयांचें मोल त्याला ह्या पंचवीस रुपयांपेक्षां अधिक वाटत होतें.

पांच रुपये ! पण ते विद्यार्थीदशेंत मिळविलेले. स्वतःच्या कष्टाचे. माझे ! मीं मिळविलेले ! किती समाधानाची गोष्ट ! किती आनंद-दायी समजूत ! आणि ह्याहीपेक्षां माझ्या शिक्षणास येणाऱ्या खर्चाचा कांहीं भाग मी जमा करतों ह्यामुळें होणारें समाधान आनंदाला आनंदित करीत असे.

आनंदाला असें वाटत असलें तर नवल नाहीं; कारण त्याची घरची अगदींच गरिबी! शिवाय कोणी मिळवणारें अगर मदत करणारें नाहीं. पैशांची मदत तर नाहीं, पण सहानुभूति तरी? धीराच्या चार गोष्टी तरी? छे! त्या सुद्धा नाहींत.

एका काळीं, म्हणजे सहा-सात वर्षांपूर्वीं आनंदाची घरची परिस्थिति साधारण बऱ्यापैकीं होती. पण आनंदाचे वडील वारल्यानंतर ही आजची परिस्थिति दैवयोगें प्राप्त झाली होती! आणि त्या परिस्थितीचें प्रतीक म्हणजेच 'आई, मला साडेपांचला उठव ग' हे आनंदाच्या तोंडचे शब्द!

आनंदा साडेपांचला स्टेशनवर जावयाचा आणि मग तो वर्तमानपत्राच्या एजंटानें (मुख्य विक्रेत्यानें) नेमून दिलेल्या लोकांकडे अंक नेऊन टाकावयाचा. इतकें करून झाल्यानंतर कमी-अधिक वर्तमानपत्रांच्या अंकांच्या मागणीचा अगर वर्गणीदारांच्या निरोपांचा हिशेब मालकाला द्यावयाचा.

हें इतकें सारें काम आटपावयास आनंदला आठ वाजावयाचे. नंतर घर,—नंतर आंघोळ,—नंतर शाळेचा अभ्यास, जेवण आणि शाळा!

आनंदाचा असा आज तीन वर्षें कार्यक्रम चालला होता. एकाच धन्याकडे तीन वर्षें सतत नोकरी करणारीं पोरें फारच थोडीं. आज येथें तर उद्यां तेथें आणि परवां? कोठेंच नाहींत! असेंच बहुधा व्हावयाचें.

पण आनंदाचें असें कांहीं झालें नव्हतें, ह्याचें कारण आनंदाच्या पुढें एक ध्येय होतें. त्याला आपलें ध्येय गांठावयाचें होतें.

आपण आईला मदत करावयाची आणि आपलें ध्येयही गांठावयाचें अशी त्याची इच्छा, असा त्याचा हेतु !

आनंदाची आईही कोणाघरचें दळण, कांडण करी. कोणाच्या घरचा स्वैंपाक करी. कोणाघरचे पापड घालण्यास जाई. कोणाघरचें लोणचें घालण्यास जाई. असें करून कांहीं तरी मिळवावयाचें आणि ही पांच रुपयांची मुलाची मदत; ह्यांत कसें तरी घरचें चालवावयाचें !

आनंदाच्या आईला वाटे, 'माझा आनंदा बारा-तेरा वर्षांचा झाला. आतां कुठें तरी उद्योगाला लागेल. पंचवीस-तीस रुपये मिळवील. मग मला असे कष्ट करावे लागणार नाहींत, मला दारोदार हिंडावं लागणार नाहीं. चार घरचीं चार कामं करावीं लागणार नाहींत ! त्या ढमढेऱ्यांना, नाहीं तर परांजप्यांना जर सांगितलं तर आनंदाला ते आपल्या हाफिसांत नोकरीला लावतीलही !' आणि तिनें एकदा आनंदाला सांगितलेंही, "आनंदा, आतां तूं कुठंतरी नोकरीला लाग."

आईचें हें बोलणें ऐकून आनंदाच्या चेहऱ्यावर थोडासा राग उमटला. तो आईला वाईट वाटेल असें काहीं तरी बोलला सुद्धा !

इतर वेळीं आनंदा आईशीं अतिशय आस्थेनें बोले. प्रेमानें वागे. तिला तो मान देई. त्याला जर कोणीं विचारलें, 'आनंदा, जगांत अत्यंत प्रिय काय ?' तर तो विचारणाराकडे अशा अर्थानें पाही कीं अरे, तुझ्या अकलेचें दिवाळें निघालें आहे कीं काय ? एवढी साधी गोष्ट कळूं नये तुला ? अरे, जगांत अत्यंत प्रिय आईशिवाय कोण असणार ?

आई ही सर्वांत पूज्य. सर्वांत श्रेष्ठ. आणखी तिच्या मोठेपणाचें वर्णन करण्यास शब्द नाहींत असें तो म्हणे.

आनंदाला चित्रें काढण्याचा थोडा-फार नाद होता. गाण्याचेंही थोडें-फार अंग होतें. चित्रपटांतील सुंदर सुंदर पदांना स्वतःच्या आवडीप्रमाणें कर्णमधुर चाली लावून तीं गाणीं गुणगुणण्याची आनंदाला संवय झाली होती. शिवाय चित्रें काढण्यांत तो अगदीं नवखा नव्हता.

पण ह्या साऱ्या कलांत पारंगत होणें कठीण. शिवाय काळही खर्ची घालावा लागतो आणि शेवटीं एक ना धड आणि भाराभर चिंध्या असेंही होतें. म्हणून एकाच गोष्टीच्या ध्येयाकडे दृष्टि ठेवून तिच्या साध्यासाठीं वाट चालत राहावयाचें !

आनंदालाही असेंच वाटे. म्हणून आनंदा गायनकलेकडे विशेष लक्ष देत नसे. आपल्याला ह्या कलेचा अगदींच विसर पडूं नये म्हणून तोंडीं लावण्यासारखाच ह्या कलेचा तो उपयोग करीत असे. चित्रकला हाच त्याचा मुख्य आहार !

पण ह्या आहाराला – चित्रकलेच्या शिक्षणाला – आनंदाला पैशांची जरूर जास्त भासूं लागली. पूर्वीपेक्षां आतां बराच पैसा लागूं लागला. पैशांशिवाय पदोपदीं अडूं लागलें. आतां पैसा मिळवावा कसा आणि येणाऱ्या अडचणी दूर कशा कराव्यात हाच प्रश्न पडला ! आणि म्हणूनच...

आई आपणाला कोठेंतरी नोकरी करावयास सांगते. तिला आपल्या ह्या किरामोरांची किंमत वाटत नाहीं. कां वाटावी ? तिला सारीच

खर्चाची बाजू दिसते ......... असा विचार करीत करीत आनंदा रस्त्याच्या कडेकडेनें घरीं येत होता.

आनंदा घरीं आला. त्यानें कोट टोपी खुंटीस अडकवून ठेविली आणि थोडा वेळ स्वस्थ पडून नंतर...

त्यानें पुन्हा कोट टोपी घातली. हातांत कागद-पेन्सिल घेतली आणि तो दीड मैल दूर असलेल्या एका टेकडीवर गेला.

ती वेळ संध्याकाळची होती. सूर्यराज दिवसभरच्या श्रमानें दमून भागून आपल्या विश्रांतिस्थानाला चालला होता. त्याचे सोनेरी किरण ढगांवर पडून ढग म्हणजे जणूं काय पिंजलेल्या सोनेरी कापसाचे ढीगच ठिकठिकाणीं ठेविलेले आहेत असें वाटत होतें. डोंगरांच्या डोक्यांवर तेच किरण पडल्यामुळें डोंगरांचीं डोकीं एखाद्या मुंडन केलेल्या साधूच्या डोक्यासारखीं चकचकीत दिसत होतीं. ह्या डोंगरांच्या पलीकडे काळसर हिरवट रंगाचें पाणी दिसत होतें. ह्या एकसमयावच्छेदें दिसणाऱ्या दृष्टींतून कावळ्यांचे, बगळ्यांचे थवे जातांना दिसले म्हणजे भारीच गंमत वाटे आणि दृश्यही मनोहर दिसे.

असा हा मनमोहक देखावा आनंदानें पंधरा–वीस–पंचवीस मिनिटें पाहिला आणि मग तो देखावा पेन्सिलीनें कागदावर उतरण्यांत आनंदा गर्क झाला. हातानें रेघोट्या आणि तोंडानें गुणगुणणें ह्यांतच तो गुंगून गेला होता.

एखाद्या विषयांत गढून जाणें, स्वतःला विसरून जाणें, ह्यांतच खरा आनंद आहे. आनंदाही अशा प्रकारचा आनंद चाखीत होता. देखावा कागदावर उतरण्यांत गढून गेला होता.

शेवटीं तो सारा देखावा कागदावर उतरून आपली ती आवडती वही आनंदानें खिशांत घातली. डावा हात तोंडावरून फिरवला. एक जोराचा सुस्कारा सोडला. पुन्हा त्या सुंदर देखाव्याचें डोळ्यांवाटें हृदयपटलावर चित्र उमटविलें. खिशांतून वही काढली, स्केच केलेला देखावा पाहिला आणि पुन्हा खिशांत घातली आणि मग...

आनंदा जड पावलांनीं घरीं निघाला.

आनंदाचे पाय घराकडील वाटेनें चालले होते आणि मन कसल्या तरी विचारांना स्पर्श करीत धावत सुटलें होतें.

आनंदा टेकडी उतरून गांवांत शिरला. थोडा रस्ता चालून नाक्यावर आला. नाक्याजवळील पांच वत्तींच्या खांबाजवळ दोन दोस्त उभे असलेले त्याला दिसले. आनंदानें त्यांच्याकडे पाहिलें आणि लटकेंच हास्य केलें. त्या दोघा दोस्तांनींही तितक्याच तत्परतेनें हास्याची परतफेड केली आणि आपल्याजवळ येण्यास आनंदाला हातानें खूण केली.

आनंदा हसत हसत त्या मित्रांजवळ गेला.

ह्या तिघां मित्रांच्या गप्पा झाल्या पण त्या साऱ्या पोकळ! आणि मग तिघे मित्र तीन रस्त्यांनीं जाण्यास सज्ज झाले. निघाले सुद्धा. इतक्यांत त्या दोघांपैकीं एकजण चटकन् मागें वळून त्यानें आनंदाला हाक मारली आणि मग आपल्या खिशांतील तो वर्तमानपत्राचा तुकडा त्यानें आनंदाला दिला!

आनंदानें वर्तमानपत्राचा तुकडा वाचला आणि मान डोलवीत तो हसला! नंतर आनंदा आपल्या मित्राला म्हणाला, "बरं, मी

उद्यां तुला तुझ्या घरीं येऊन भेटतों." असें सांगून आनंदा विचार करीत घरीं आला.

आनंदाची आई वाट पाहातच बसली होती. तिला आनंदा दिसतांच आनंद झाला. तिनें आनंदाला आणि स्वतःला जेवण वाढून घेतलें आणि माय-लेकरें प्रपंचाच्या गोष्टी बोलत जेवलीं.


आनंदा सारी रात्र विचार करीत पडला होता. आपण कोणतें चित्र प्रदर्शनाला पाठवावें? जीं जुनीं चित्रें काढलेलीं आहेत त्यांपैकीं कीं एखादें नवें, कीं टेकडीवर बसून रेखाटलेलें?

ह्या अशा विचारांच्या रस्सीखेचींत 'टेकडीवर बसून रेखाटलेलेंच चित्र पाठवावें' ह्या विचाराचा जय झाला.

सकाळीं उठून नित्याचीं कामें त्यानें भराभर आटोपलीं. नंतर चित्रांत रंग भरण्यास आरंभ केला.

एक–दोन–तीन दिवसांनीं चित्र पुरें केलें. पण प्रदर्शनाला चित्र पाठवावें कीं नको हें अद्याप निश्चित होईना. त्याचें एक मन म्हणे– 'नगाऱ्यापुढें टिमकी; राजापुढें प्यादा; सूर्यापुढें काजवा; तसा बड्या चित्रकारांपुढें मी! मला असल्या बड्या प्रदर्शनांत पुसतो कोण? बड्या बड्या चित्रकारांच्या चित्रांना जिथें नुसता नंबरही मिळत नाहीं, तिथें माझ्यासारख्या होतकरू, नुकत्याच रेघोट्या ओढूं लागलेल्या चित्रकाराचं चित्र ठेवावयास जागा तरी मिळेल कीं काय कोण जाणे! मग बक्षिसाची आशा इंद्रपद मिळण्याइतकीच शक्य!'

पण आनंदाचें दुसरें मन अगदीं हिरीरीनें सांगत होतें,–'अरे आनंदा, तूं चित्रं चांगलीं काढतोस कीं वाईट हें ठरवायचं कुणीं?



तूं का ? छे ! वेड्या, स्वतःची किंमत, स्वतःची कला, स्वतःचं रूप, स्वतःला कधीं कळत नाहीं. तें दुसऱ्यांना फार लवकर कळतं. आपणाला जें येतं, माहीत आहे, जी कला अवगत आहे, जगाला जें सांगावंसं वाटतं, जगाला कळावंसं वाटतं तें जगाच्या पुढें मांडलं पाहिजे. जगाला तें सांगितलं पाहिजे. जगाला कळवलं पाहिजे. जगाला तें पचलं, रुचलं तर जग त्याचं आनंदानें–हसतमुखानें स्वागत करील. तूं आपलं चित्र कलकत्त्याला भरणाऱ्या भारतीय चित्रकला प्रदर्शनांत पाठव ! भिऊं नकोस. बाबा रे, कित्येक रत्नं भिऊनच काय होईल, कसं होईल, चांगलं का वाईट, करूं कीं नको म्हणूनच मातींत दडपून पडलीं आहेत. आनंदा, कांहीं विचार करूं नकोस.'

आनंदा अशा विचारांच्या रस्सीखेचीनें दमून झोपीं गेला.

सकाळीं आनंदा उठण्यापूर्वीच त्याचे कालचे ते दोघे मित्र दरवाजांत उभे होते. त्यांनीं आनंदाला हाका मारून उठविलें. मित्रच ते ! त्यांना आनंदाची अडचण माहीत होती आणि म्हणूनच ते दोघे मित्र चित्रांच्या प्रवेश-फीचे पैसे घेऊन आनंदाकडे सकाळींच आले होते !

आणि त्यांच्याच आग्रहानें त्यांनींच दिलेल्या वर्तमानपत्रांतील माहितीवरून आणि त्यांनींच दिलेल्या प्रवेश-फीच्या मदतीमुळें आनंदाचें चित्र कलकत्त्याला रवाना झालें.

आणि मग तो नेहमींप्रमाणेंच आपल्या नित्याच्या कार्यांत गुरफटून गेला.

असे पंधरा दिवस गेले आणि एक दिवस सकाळींच पोस्टमननें आनंदाच्या दारापुढें येऊन ‘आनंद आत्माराम आपटे’ असें म्हणून एक लखोटा आनंदाच्या हातांत दिला.

आनंदाला जरा आश्चर्य वाटलें. त्यानें लखोटा उलटून सुलटून पाहिला आणि घाईघाईनें फोडला! त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना! तो आनंदानें उड्या मारीतच आईजवळ गेला आणि म्हणाला, “आई, दोनशें रुपये बक्षीस, दोनशें रुपये!”

आनंदाच्या बोलण्याचा त्याच्या आईला कांहींच उलगडा होईना. दोनशें रुपये कशाबद्दल? काय बडबडतो हा?

आनंदाचा पहिला बहर ओसरल्यावर तो एका पाटावर बसला. त्यानें दोनशें रुपये कशाबद्दल मिळाले हें सांगितलें.

आनंदाच्या आईला अत्यानंद झाला. तिनें त्याच्या पाठीवरून हात फिरविला आणि ती म्हणाली, “माझा बाळ आहेच गुणाचा!”

नंतर आनंदा आपल्या मित्रांच्या घरीं गेला. त्यानें बक्षिसाची बातमी सांगितली!

आनंदाच्या यशाबद्दलची बातमी त्याच्या मित्रमंडळींत पसरली. जो तो आनंदाचें कौतुक करूं लागला.

आणखी चार दिवसांनीं आनंदाला एक लखोटा आला. त्या लखोट्यांतील मजकूर वाचून आनंदाचा आनंद अगदीं पराकोटीला गेला होता. त्याचें तें चित्र एका बड्या लक्षाधीशानें विकत घेतलें असून त्याबद्दल पांचशे रुपये आनंदाला मिळणार होते.

पांचशें रुपये मिळणार हें ऐकून आनंदाच्या आईला किती आनंद झाला हें वर्णन करणें अगदीं अशक्य आहे. काल पांच पैशांना महाग असलेला आनंदा व त्याची आई आज पांचशें रुपयांची मालकीण होती.

आनंदाच्या आईनें साऱ्या शेजारणींना आनंदाच्या पराक्रमाची हकीकत तिखटमीठ लावून सांगितली आणि मग दोन दिवसांनीं प्रत्येक घरीं पेढ्यांची पुडी दिली व 'माझ्या आनंदाला बक्षीस मिळाल्याबद्दल बरं का!' असें सांगितलें.

# गोविंद गोपाळ





सुखगांव हा खरोखरच नांवाप्रमाणें सुखी होता. त्या गांवांतील लोक सुखी होते. आनंदी होते.

सुखगांव हा दोन निरनिराळ्या घरांच्या समुदायांनीं, म्हणजे दोन वाड्यांनीं बनला होता. एक ‘भटवाडी’ आणि दुसरी ‘नाईकवाडी.’ भटवाडींत ब्राह्मण, मराठे ह्यांचीं आणि नाईकवाडींत महारांचीं घरें होतीं.

सुखगांव हा आजुबाजूच्या दहा–पंधरा गांवांत प्रसिद्ध होता. ह्याचें कारण आबाभटजी आणि खंड्या महार.

आबाभटजी वेदशास्त्रांत निपुण होते. शिंक पाहाण, शकुन पाहाणें, मुलांचीं जन्मटिपणें करणें, मुहूर्त पाहाणें अशा कामाकरितां आबाभटजींच्या घराकडे बहुतेकांचे पाय वळावयाचेच!

खंड्या महार गांवठी औषधें देण्यांत हुशार होता. रोगाचें अचूक निदान करून झाडपाल्याचें औषध देणें, शरीराचीं निखळलेलीं हाडें सहजच योग्य ठिकाणीं बसविणें, ह्याकरितां खंड्याच्या झोपडीकडे लोकांचें येणें जाणें असे.

आन्नाभटजी आणि खंड्या महार ह्या दोघांची दोस्ती नसली तरी 'बरें' होतें.

आबांकडे पावसाळ्याच्या बेगमीची लाकडांची फोड करण्यास खंड्या यावयाचाच आणि त्या दिवशीं काळ्या वाटाण्यांची आमटी व वडे हें पक्वान्न आबांच्या घरीं खंड्याकरितां व्हावयाचें आणि "खंड्या, आणखी चारच वडे नि एकच द्रोण आमटी खाल्लीच पाहिजे" म्हणून आन्नांनीं खंड्याला आग्रह करावयाचाच !

आन्नाभटजी आणि खंड्या महार ह्यांच्या प्रेमळ वागण्यानें आबांचा गोविंद आणि खंड्याचा गोपाळ ह्यांची दोस्ती जमली होती.

गोविंद-गोपाळ अगदीं, अगदीं जिवलग दोस्त होते. ह्या दोघा दोस्तांची गांठ दररोज रानांत पडे. पुष्कळ गुराखी रानांत येत. एखाद्या झुबकेदार झाडाखालीं बसत आणि मग नाच-गाणीं, थट्टा-विनोद करीत. कधीं कधीं सगळ्यांनीं आणलेली शिदोरी एका मोठ्या पत्रावळीवर पसरीत. सगळे गुराखी पत्रावळीसभोवतीं बसत आणि या अनेकचवी, अनेकरंगी जेवणाचा आनंदानें समाचार घेत.

पण ह्या आनंदाच्या—मजेच्या प्रसंगांत गोविंद-गोपाळला भाग घेतां येत नसे. कारण एक ब्राह्मणाचा मुलगा आणि एक महाराचा !

गोविंद गोपाळविषयीं आणि गोपाळ गोविंदविषयीं अतिशय प्रेम दाखवी. ते एकमेकांबरोबर आनंदानें खेळत, नाचत, उड्या मारीत. गळ्यांत गळा घालीत. एकमेकांवर अत्यंत प्रेम करीत. थोडक्यांत, गोविंद-गोपाळ ही व्यक्ति एकच पण त्यांचीं नांवें मात्र दोन असें म्हटलें तरी चालेल. सुखगांवचे लोक असें म्हणतही असत.

गोविंद आपण नेलेले पोहे, लाडू गोपाळला देई आणि अगदीं खरें सांगूं? गोपाळनें आणलेल्या चटणी-भाकरीची चवही गोविंद कधीं कधीं घेई.

एकाद्या दिवशीं गोविंद-गोपाळची भेट होत नसे. ज्या दिवशीं असें होई, त्या दिवशीं संध्याकाळीं गोविंदच्या घरापुढील वाटेवर गोपाळ उभा राहून हळूच हाक मारी, 'गोइंददादा, रे गोइंददादा' आणि ही मित्राची प्रेमळ हाक कानीं पडतांच गोविंद मोठ्यानें 'ओ' न देतां मुकाट्यानें गोपाळजवळ जाई आणि 'काय रे गोपाळ, आलास?' असें हसत हसत म्हणे. नंतर ती गोविंद-गोपाळची जोडी एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून शेताच्या बंधाराच्या आड एक–एक, दोन–दोन तास गप्पा मारीत बसे.

एकदा असेच हे दोघे दोस्त एका बंधाऱ्याच्या आड कसलें तरी हितगुज करीत बसले आहेत हें आबा भटजींनीं पाहिलें आणि आबांचे डोळे निखाऱ्यासारखे लालभडक झाले. जणूं काय रागाच्या फुंकरानें हृदयांतील विस्तव चेतवल्यामुळें त्याच्या ज्वाला डोळ्यांत दिसत आहेत. आबांचे हात थरथर कांपूं लागले. जणूं काय रागरूपी अग्नीनें उत्पन्न झालेल्या विजेच्या योगानेंच ते थरथरत आहेत. पाय थरथरण्याचें कारणही तेंच असावें! आबांच्या सगळ्याच अंगाचा भडका उडाला होता!

आबांनीं तें दृश्य पाहिलें आणि ते रागारागानें घरीं आले. ते कोणाबरोबरच कांहीं विशेष बोलले नाहींत. निमूटपणें त्यांनीं जेवण आटोपलें. नंतर ते आंथरुणावर बसले आणि मग मात्र त्यांनीं एकदम गडगडाट केला. शब्दांचा पाऊस पडला. आकाश-

पाताळ एक केलें. गोविंदचा त्यांनीं चांगलाच समाचार घेतला. 'धर्म बुडवलास, वाडवडिलांच्या तोंडाला काळं फासलंस' वगैरे बडबडले. आणि सर्वांच्या शेवटीं 'उद्यांपासून त्या कारट्याची नि तुझी भेट नव्हेच, पण दृष्टादृष्टही होतां कामा नये' असें त्यांनीं बजाविलें व असें वागला नाहींस तर 'तुझीं हाडं मऊ करीन, घरांतून हाकलून देईन' अशी धमकीही दिली.

गोविंदला अतिशय वाईट वाटलें. आबांच्या तोंडचे शब्द जणूं काय आगीचे झोतच! ते झोत आपल्या कानांत जाऊं नयेत म्हणूनच कीं काय, गोविंदनें दोन्ही कानांवर दोन हात ठेविले आणि तो चटकन् खालीं बसला.

आबांच्या शब्दावर गोविंद अक्षरही बोलला नाहीं हें खरें, पण आंथरुणावर पडल्या पडल्या त्याच्या मनांत आलें, 'गोपाळ खरोखरच का वाईट आहे? दुष्ट का आहे? घाणेरडा का आहे? छे, छे! मुळींच नाहीं. गोपाळचं बोलणं घाणेरडं का आहे? नाहीं, त्याच्या बोलण्याला कोण म्हणेल घाणेरडं? तो किती गोड गोड बोलतो. तो किती गोड गोड हसतो. त्याचं हृदय किती पवित्र आहे, निर्मळ आहे! जसं कांहीं गंगोदकच. गोपाळबरोबर माझी मैत्री कां नसावी? त्याच्या निर्मळ गळ्यांत माझा पवित्र हात मीं कां घालूं नये? त्याच्याशीं जिवाभावाच्या गोष्टी कां बोलूं नये? तो महार म्हणून? का तो काळा दिसतो म्हणून? का लोक म्हणतात महाराला शिवूं नये म्हणून? ब्राह्मणाच्या जन्माला जाणं त्याच्या का हातीं होतं? रंगानें गोरा असणं त्याच्या का हातीं होतं?

निर्मळ राहाणं त्याच्या हातीं आहे; तें तो करतो ना? गोड-गोड बोलणं त्याच्या हातीं आहे; तें तो करतो ना? मग?'

असा विचार करीत करीत गोविंद झोपीं गेला.


दुसऱ्या दिवशीं गोविंद-गोपाळची भेट रानांत झाली. पण आज गोपाळला पाहून गोविंदचें हृदय फुलेना, डुलेना. तो आनंदित दिसेना. गोपाळबरोबर बोलण्याचें तो शक्य तितकें टाळूं लागला.

आतां संध्याकाळ झाली. गुरें घरीं नेण्याची वेळ झाली. गोविंद गोपाळकडे टक लावून पाहूं लागला. त्याचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरून आले. ओठ कोरडे पडले.

गोविंदनें ओठांवरून जीभ फिरविली. ओठ ओले केले आणि तो अडखळत अडखळत गोपाळला सांगूं लागला, "गोपाळ, प्रेमाची दोरी तोडली गेली रे! तुझ्या–माझ्या दोस्तीच्या दोऱ्या तोडल्या गेल्या. आतां ह्यापुढें तुझी–माझी भेट नाहीं. गोपाळा, गोपाळा!"

गोविंदनें गोपाळला घडलेली सारी हकीकत सांगितली. गोपाळचे डोळे पाण्यानें डबडबले. त्याचा कंठ दाटून आला.

त्या दिवशीं त्या दोघा निर्मळ, पवित्र, निष्पाप जिवांनीं एकमेकांना मिठी मारली. ते ओक्साबोक्शीं मनमुराद रडले. हृदयांतील दुःखाला पाण्याच्या रूपानें डोळ्यांतून वाट दिली. दुःखाचा आवेग ओसरूं दिला आणि मग त्यांनीं जड पावलांनीं एकमेकांचा निरोप घेतला.



दहा पंधरा दिवस गेले. पण एका गांवांत असून त्या दोघा प्रेमळ भावांची भेट नाहीं. सुखगांवचे दोन डोळे एकमेकांना भरल्या डोळ्यांनीं पाहूं शकत नव्हते. माणसांच्या जवळ जवळ असणाऱ्या आणि भावाच्या नात्यानें वागणाऱ्या दोन डोळ्यांची जी स्थिति तीच स्थिति गोविंद-गोपाळची होती.

त्या दिवसापासून आजपर्यंत त्यांना एकमेकांचें दर्शन झालें नव्हतें कीं एकमेकांबद्दल कोणाच्या तोंडून नांवही ऐकूं आलें नव्हतें.

पण नाईकवाडींत आज मात्र कोणीतरी बोललें.

" बामणाचा गोइंदा लय बिमार हाय. "

गोपाळच्या कानीं हे शब्द पडले, त्याबरोबर आपल्या काळजाला कोणींतरी सुई टोचल्याचा त्याला भास झाला. तो गोविंदच्या आजारीपणाला घाबरला. त्याला अतिशय दुःख झालें. तो अगदीं दिवेलावणीच्या सुमाराला गोविंदच्या घराकडे गेला. घराच्या कोपऱ्याजवळ दूर–दूर कुंपणाआड उभा राहिला. गोविंद दिसावा म्हणून इकडे तिकडे पाहूं लागला. गोविंदचे शब्द कानीं पडावे म्हणून कान देऊन ऐकूं लागला, पण त्याला गोविंद दिसला नाहीं. त्याचें बोलणें ऐकूं आलें नाहीं. गोविंद दिसणार कसा ? त्याचें बोलणें ऐकूं येणार कसें ? गोविंद आजारी होता ना ?

गोपाळ थोडा वेळ उभा राहिला. नंतर त्यानें एक जोराचा सुस्कारा सोडून आकाशाकडे पाहिलें आणि तो जड पावलांनीं घरीं आला.

घरीं येतांच गोपाळनें घोंगडी पसरली आणि तिच्यावर तो आडवा झाला.

त्या दिवसापासून त्यानें आपलें खाणें-पिणें बंद केलें.

गोपाळनें असें कां केलें, तो खात-पीत कां नाहीं, कोणाशीं कां बोलत नाहीं हें कोणालाच कळेना आणि गोपाळ कोणालाच सांगेना !

शेवटीं गोपाळच्या आईकरवीं खंड्याला कळलें कीं 'आबा बामणाचा गोविंदा लय बिमार आहे त्यास (खंड्यानें) जाऊन वखात द्यावं आणि साफ करावा,' असें गोपाळचें म्हणणें आहे.

"पण आबानें मला बोलवाया कां येऊं नये? मी वखात दिलं तर पांढरीच्या किरपेनें तो बराबी होयल. पण आबानें नको का यावास? आबा मला बोलवायाबिगर मी नाय जायाचा त्याच्या पायाकडे ! माझ्या पोरास त्याचं घर बंद झालं तर मीं कशास जावं त्याच्या घरला ?"

खंड्याचें म्हणणें अगदींच कांहीं खोटें नाहीं. आबांना लोक सांगतही, "आबा, तुम्हीं डॉक्टर आणलेत. हकीम आणलेत. मांत्रिक आणलेत पण गोविंदला गुण नाहीं. आतां खंड्याला तरी आणा. त्याच्या हाताला गुण आहे. त्यानें असले रोगी बरे केले आहेत. बोलवा त्याला."

आबांनाही केव्हां केव्हां वाटे, बोलवावा खंड्याला. पण नको. मी जातीवंत ब्राह्मण आहें. महाराच्या हातचं औषध माझ्या मुलाला? त्याच्या पोरानें माझ्या पोराला बाटवायचा प्रयत्न केला म्हणून खंड्याला नि त्याच्या पोराला मीं माझं घर बंद केलं. आतां परत मीच त्याला बोलवायला जाऊं ? छे, छे ! हें कदापि व्हायचं नाहीं.

पण खंड्या? तो आज सकाळींच निघाला. त्यानें औषधांचा बटवा काखेला मारला. त्यानें घोंगडी खांद्यावर टाकली, हातांत काठी घेतली आणि तो आबाभटजींच्या घराकडील वाटेनें चालूं लागला.

खंड्या थोडासा चालून गेला तों काय आश्चर्य! आबाभटजी आपल्या झोपडीकडे येत आहेत असें खंड्याला दिसलें.

खंड्या जागच्या जागीं उभा राहिला.

आबाभटजी आणि खंड्या महार ह्यांची दृष्टादृष्ट झाली. दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें व माना खालीं घातल्या.

"आबा, गोइंदाला वखात देया मी येत होतों." खंड्या म्हणाला.

"खंड्या, त्याचकरतां मी तुला बोलवायला येत होतों." आबा म्हणाले.

दोघांनींही एकमेकांकडे आनंदानें पाहिलें.

आबा आणि खंड्या आबांच्या घरीं गेले.

खंड्यानें गोविंदला औषध दिलें.

दुसऱ्या दिवशीं गोपाळ आबाभटजींच्या घराबाहेर दूर उभा राहिला आणि त्यानें विचारलें, "आबा, गोइंददादा कसे हायती?"

"आतां थोडा आराम पडत चालला आहे. अरे गोपाळ, असा इथें आंत ये. बस ह्या बाकावर. बाहेर रे कां उभा? बस, बस."

गोपाळ भीत भीतच बाकावर बसला आणि मग थोड्या वेळानें घरीं गेला.

दुसऱ्या दिवशींही असेंच घडलें.

तिसऱ्या दिवशीं तो आबाभटजींच्या ओटीवर गेला. गोविंदची चौकशी करूं लागला. पण आबा म्हणाले, "अरे, ओटीवर कां उभा? घरांत जा. गोविंदबरोबर बोल जा."

गोपाळ आबांच्या घरांत गेला. त्यानें डोळे भरून गोविंदला पाहिलें आणि मग तो कांहीं वेळानें घरीं गेला.

थोड्या दिवसांनीं गोविंद आजारांतून बरा झाला. देवानें दया केली म्हणून आबांच्या घरीं 'गोड-धोड' केलें होतें आणि त्या दिवशीं आबांनीं मुद्दाम आग्रह करून गोपाळला जेवावयास बोलाविलें होतें.

आणि त्या दिवशीं गोविंद-गोपाळ चंदनी पाटावर बसून जेवतांना आबा आनंदानें पाहात होते!




दोघे दोस्त होते. एकाचें नांव होतें जिवा आणि दुसऱ्याचें नांव होतें शिवा. जिवा धट्टाकट्टा होता आणि शिवा आंधळा होता. आणि दोघेही अगदीं दरिद्री होते.

जिवा-शिवाच्या हातून ना काम, ना उद्योगधंदा. खाण्याला पोटभर जर अन्न नाहीं तर विचाऱ्यांच्या अंगांत ताकद तरी कोठली असणार? आणि ताकद नाहीं म्हणून ना काम, ना उद्योगधंदा! शिवाय शिवा आंधळा. तो बिचारा कसलें काम करणार?

म्हणूनच जिवा चार घरें मागे आणि मिळेल त्यावर आपला आणि आपल्या मित्राचा – जिवाचा जीव जगवी!

असा त्यांचा रोजचा क्रम चालला होता.

एक दिवस जिवा-शिवा विश्वेश्वराच्या देवळांत आपल्या गत आयुष्याच्या गोष्टी करीत बसले असतां शिवा सहज म्हणाला, "जिवा, आपले हे दिवस असेच चालले आहेत. आपण मागच्या

जन्मीं कांहीं पाप केलं होतं त्याचे परिणाम आज भोगीत आहोंत. म्हणून ह्या जन्मीं तरी कांहीं पुण्य करून ठेवूं या. मग पुढच्या जन्मीं कांहीं सुखाचे दिवस लाभले तर लाभले! लोक म्हणतात, देवाची भक्ति केली असतां ह्याच जन्मीं देव पावतो. तो वर देतो नि जन्माचं सार्थक होतं."

"बरं, पण तुझं म्हणणं काय?" जिवा म्हणाला.

"आपण कांहीं तरी भक्ति करूं या. देवाची प्रार्थना करूं या. देवा, आम्हां गरिबांवर दया कर, कृपा कर अशी विनवणी करूं या." शिवा म्हणाला.

अशा प्रकारचें जिवा-शिवाचें पुष्कळ बोलणें झालें आणि शेवटीं त्या दोघांनीं दूर अरण्यांत जाऊन देवाची, कैलासनाथाची भक्ति करण्याचें ठरविलें.

आणि दुसऱ्या दिवशीं जिवा-शिवा दूर दूर एका अरण्यांत गेले.

ज्या अरण्यांत जिवा-शिवा गेले त्या अरण्यांत मोठमोठे वृक्ष होते. कित्येक वृक्षांना तर मोठमोठ्या ढोली होत्या. त्यांतील कित्येक ढोलींत खारी राहात. कित्येक ढोलींत अजगर राहात. कित्येक ढोलींत साप राहात आणि कित्येक ढोली रिकाम्याच होत्या.

रिकाम्या ढोलींपैकीं जवळ-जवळच्या दोन ढोली जिवानें पसंत केल्या. त्यानें त्या साफसुफ केल्या. दगडानें ठोकून व खोदून राहाण्यास, बसण्यास योग्य केल्या. मग जिवानें एका ढोलींत शिवाला बसवून दुसऱ्या ढोलींत आपण बसला.

आतां संध्याकाळ झाली. काळोखाचें पूर्ण साम्राज्य झालें. रातकिड्यांचे किर्ऽऽ आवाज अधिकच भेसूर येऊं लागले.

जिवा शिवाला म्हणाला, "शिवा, आतां आपापल्या नव्या घरांत झोपूं या ना ? रात्र पडूं लागली."

शिवानें 'होय तर! झोपूं या' असें म्हणून हात जोडले. तोंडानें शंकराचें – कैलासनाथाचें चार पांच वेळां नांव घेतलें.

ते दोघे झोपीं गेले खरे, पण त्यांना झोप कशी येणार ? कारण कोल्ह्यांची कोल्हेकुई, हत्तींच्या तुताऱ्या, वाघांच्या डरकाळ्या, सिंहांच्या गर्जना त्यांच्या कानांवर आदळत होत्या. जिवा-शिवा अगदीं भयभीत झाले होते. ती रात्र त्यांनीं डोळे मिटून पण जागून काढली!

दुसऱ्या दिवशीं जिवा उठला. त्यानें शिवाला ढोलींतून जमिनीवर उतरविलें व हाताला धरून जवळच्या नदीवर नेलें. दोघांनींही सारे प्रातर्विधि आटोपले. मग जिवानें पुन्हा शिवाला ढोलींत आणून बसविलें व आपण फळें आणण्यास गेला. शिवा 'कैलासनाथ, कैलासनाथ' असा नामोच्चार करीत बसला.

जिवाचा बहुतेक वेळ असा तसाच जाई आणि शिवाचा बहुतेक वेळ कैलासनाथाच्या आराधनेंत जाई.

शिवा आंधळा. त्याची सारी काळजी जिवा घेई. जिवा आणि शिवा रामलक्ष्मणांसारखे त्या अरण्यांत राहात असत.

एक दिवस शिवा जिवाला म्हणाला, "जिवा, आज कित्येक वर्षं आपण परमेश्वरभक्ति – कैलासनाथाची भक्ति करीत आहोंत; पण कैलासनाथ आपणाला कां बरं दर्शन देत नाहीं? तुकारामाला, गोऱ्या कुंभाराला, ध्रुवाला......अशा कित्येक भक्तांना भोलानाथानें दर्शन दिलं; मग आमच्यावरच इतकी अवकृपा कां ?"

शिवाचें हें बोलणें ऐकून जिवा हसला. त्याच्या हसण्याचा अर्थ 'कसली भक्ति आणि कसलं भोलानाथाचं दर्शन!' असाच असावा. पण शिवाला जिवाचें हसणेंच समजलें नाहीं! मग त्यांतला अर्थ कसा समजणार?

शिवानें हात जोडले आणि 'भोलानाथ भोलानाथ' असा नामोच्चार केला.

त्या दिवशीं अधिक कांहीं घडलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं मात्र एक मोठाच प्रकार घडला.

शिवा भक्तींत दंग झाला होता. तो आपल्या घरांत बसून गाणें म्हणत होता आणि जिवा आपल्या घरांत बसून तें ऐकत होता. इतक्यांत,

'वांचवा! वांचवा! आम्हांला वाघाच्या दाढेंतून वांचवा' असे शब्द त्यांच्या कानांवर आले. अगदीं जवळ–अगदीं जवळ शब्द ऐकूं येऊं लागले आणि क्षणार्धांत एक वृद्ध ब्राह्मण आणि त्याची वृद्ध बायको भयभीत होऊन आपल्याकडे धावत धावत येत आहेत असें जिवाला दिसलें. शिवा बिचारा आंधळा. त्याला ब्राह्मणब्राह्मणी कशीं दिसणार? जिवाला त्यांचे करुण शब्द आणि वाघाच्या डरकाळ्या ऐकूं येत होत्या.

'वांचवा! वांचवा! वाघाच्या दाढेंतून वांचवा रे कुणीतरी. सोडवा रे कुणीतरी.' असें ब्राह्मणब्राह्मणी ओरडत होतीं. धावत येत होतीं.

शिवानें ते शब्द ऐकले मात्र आणि तो एकदम मोठमोठ्यानें म्हणाला, "या, या, या. तुमच्या मागें वाघ लागला आहे असें

म्हणतां तर माझ्या ह्या ढोलींत चटकन् या. बाबांनो, मी आंधळा आहें, नाहीं तर तुमच्या मदतीला धावून आलों असतों." नंतर तो जिवाला ओरडून म्हणाला, "जिवा, जा रे बाबा त्या माणसांच्या मदतीला. बिचाऱ्यांना वांचव वाघाच्या दाढेंतून. जा जा. लवकर जा रे जिवा!"

त्यावर जिवा म्हणाला, "मरूं दे त्यांना. आपला जीव फुकाचा कां संकटांत घाला? तूं गप्प बस आपला. मीही बसतों गुपचूप!"

ब्राह्मणब्राह्मणी धावत धावत येत होतीं. ओरडत होतीं, 'वांचवा! वांचवा! वाघाच्या दाढेंतून वांचवा.'

ओरडत ओरडत तीं जिवाशिवाच्या ढोलींजवळ–घरांजवळ आलीं. तीं जिवाला म्हणालीं, "घे रे बाबा तुझ्या घरांत आम्हांला. तो बघ आला. तो तो आला. खाईल, फाड फाडून खाईल आम्हांला. घे. घे." पण जिवा गुपचूप लपून राहिला. तो कांहींच बोलला नाहीं. पण...

शिवा एकदम ओरडला, "या, या, या! माझ्या ह्या घरांत या."

"पण आम्हां दोघांना कशी जागा होणार? तुला नि आम्हां दोघांना नाहीं पुरणार ही जागा!"

"असं होय? तर मी उतरतों जमिनीवर." असें म्हणून शिवा चांचपडत चांचपडत घाईघाईनें जमिनीवर उतरला आणि मग ब्राह्मण व त्याची बायको शिवाच्या घराजवळ–ढोलीजवळ गेलीं, इतक्यांत वाघ डरकाळ्या फोडीत आलाच. तो आतां शिवाला खाणार! अगदींच शिवाच्या जवळ आला ना! आतां?



"अरे थांब !" असें जोरानें म्हणत ब्राह्मणब्राह्मणी जमिनीवर आलीं. ब्राह्मणानें वाघाच्या पाठीवरून हात फिरविला, त्याबरोबर वाघाऐवजीं नंदी दिसूं लागला. नंतर ब्राह्मण शिवाला म्हणाला, "हे महान् भक्ता, डोळे उघड ! पाहा !"

शिवानें ब्राह्मणाकडे पाहाण्याचा प्रयत्न केला. तों काय आश्चर्य, त्याला उमाशंकर दिसले. शिवानें आपल्या डोळ्यांवरून एकदा दोनदा हात फिरविला. एक क्षणभर उमाशंकरांकडे टक लावून पाहिलें व त्यांना नमस्कार केला.

"भक्ता ऊठ. तुझी भक्ति, तुझी श्रद्धा, तुझी भूतदया, हीं पाहून मी तुला प्रसन्न झालों आहें. आम्ही दोघं वृद्ध ब्राह्मणब्राह्मणी झालों, नंदीला वाघाचं रूप दिलं नि तुझी भक्ति, तुझी भूतदया ह्यांची परीक्षा पाह्यली. तूं माझ्या परीक्षेला उतरलास, म्हणून तुझ्यावर मी संतुष्ट झालों आहें. तुला काय पाहिजे तें माग."

"देवा, आपण दृष्टि दिलीत. नवी दृष्टि दिलीत. मला आपली भक्ति, आपलं स्मरण—आपली आठवण—सदा घडो हीच माझी इच्छा. हीच माझी मागणी."

कैलासनाथ शिवावर अधिकच संतुष्ट झाले आणि "भक्ता, मी तुला वर देतों. त्याचा तुला पाहिजे तेव्हां, पाहिजे तो उपयोग कर." असें म्हणून उमारमण नंदीसह अंतर्धान पावले.

आपल्याला कैलासनाथानें दर्शन दिलें ह्याचा शिवाला किती तरी आनंद झाला होता. शिवा जिवाला विसरलाच होता म्हणा ना ! त्याला आतां जिवाची आठवण झाली. तो आनंदानेंच जिवाला हाका मारूं लागला, "जिवा, जिवा, ये. लपून काय

बसलास? मला देवानें, माझ्या कैलासनाथानें, माझ्या उमारमणानें, माझ्या नीलकंठानें दर्शन दिलं. मला नवी दृष्टि दिली. ये. डोळे भरून तुला पाहूं दे. ये. जिवा, ये लवकर."

जिवानें ढोलींतून डोकावून पाहिलें. वाघ नाहीं ना ह्याची खात्री करून घेतली. मग जिवा शिवाजवळ आला. शिवानें जिवाला सारी हकीकत सांगितली.

मग मात्र तो शिवावर रागावला. रागारागानें तो शिवाला म्हणाला, "शिवा, तूं नि मी आज कित्येक वर्षं एके ठिकाणीं राहिलों. तूं आंधळा. तुला मीं 'चार घरं मागून' खाऊं घातलं. तुझ्यावर अनंत उपकार केले. तुझ्या इच्छेकरितां म्हणून ह्या निबिड अरण्यांतही येऊन राहिलों, कांट्याकुट्यांत फिरलों, फळं-मुळं गोळा केलीं, तुला खाऊं घातलीं. पण मला तूं विसरलास! देवाचं दर्शन घडवलं नाहींस..." अशा प्रकारें जिवा शिवाला रागारागानें बोलला. पण...

शिवा कांहींच बोलला नाहीं. तो एकदा मात्र हळूच पुटपुटला, "खरंच, माझीच चूक! जिवा, मी नीलकंठाच्या—कैलासनाथाच्या तेजानें दिपून गेलों. जिवा, मला तूं क्षमा कर. क्षमा करशील ना?"

पण हें शिवाचें पुटपुटणें ऐकण्यास जिवा तेथें थांबला नाहीं. तो रागारागानें निघून गेला.

जिवाच्या जाण्यानें शिवाला अतिशय वाईट वाटलें. आपला जिवलग मित्र आपणाला अंतरला! दुरावला! माझाच अपराध. माझीच चूक......

अशा प्रकारें शिवा विचार करीत, जिवा ज्या दिशेनें गेला त्या दिशेकडे शून्य नजरेनें पाहात एका वृक्षाखालीं बसला; पण थोडाच वेळ!

शिवानें कांहीं तरी निश्चित झाल्यासारखें केलें. तो चटकन् उठला. झरझर चालूं लागला. ज्या दिशेनें जिवा गेला त्या दिशेनें शिवा चालूं लागला.

शिवा भराभर चालूं लागला. जिवा कोठें दिसतो का म्हणून इकडे तिकडे पाहूं लागला. पण शिवाला जिवा कोठेंच दिसेना. कां बरें दिसेना? तो दुसऱ्या वाटेनें तर गेला नसेल ना?

शिवा चालतच होता. तो आतां चालून चालून दमला म्हणून एका वृक्षाखालीं बसला. थोडा वेळ त्यानें विश्रांति घेतली आणि मग तो पुन्हा नव्या दमानें चालूं लागला.

शिवाचे पाय चालत होते तसे शिवाच्या मनांत विचारही चालले होते. त्यांतल्या त्यांत एक विचार बेफाम धावत होता तो म्हणजे, 'मी अंध असतां जिवानें चार घरं मागून नि आपण अर्धपोटीं, नव्हे उपाशी राहून मला जगवलं. स्वतः दुःखांत राहून मला सुखांत ठेवलं. आम्ही दोघे जिवाभावाचे मित्र नि ही मैत्री जमली तरी कशी? ती मोठी गंमतच म्हणायची! मी महाकालेश्वराच्या देवळाच्या महाद्वारा-जवळ फडकं पसरून 'आंधळ्याला भिक्षा' मागत असतां तिथेंच एका बाजूच्या धक्क्यावर जिवा नित्य येऊन बसत असे. तो माझी मिळकत पाही. मला पुरेशी मिळकत नसल्यामुळें केव्हां केव्हां उपाशी राहावं लागतं, जमिनीला पोट लावून एक एक, दोन दोन दिवस घालवावे लागतात हेंही तो पाही. पण असे दिवस फारसे काढावे

लागले नाहींत. जिवाला माझी दया आली. तो मला दररोज कांहीं ना कांहीं आणून देऊं लागला. पुढें पुढें तर तो मला खाऊं घातल्याशिवाय आपण कांहीं खातच नसे इतकंच नव्हे, तर आमचं दोघांचं खाणं-पिणं, बसणं-उठणं सारं एके ठिकाणीं ! पण आज ?

' जिवा कुठं असेल कोण जाणे ! '

शिवानें सुस्कारा सोडला. थोडा वेळ अगदीं निश्चल राहिला. मग पुन्हा एकदा सुस्कारा सोडून तो उठला. चार-सहा पावलें दूर गेला.

शिवानें उत्तर दिशेकडे तोंड केलें. गुडघे टेकले. हात जोडले. आकाशाकडे डोळे लाविले व तो म्हणाला, " उमा-रमणा, माझ्या कैलासनाथा, तूं मला जो एक वर दिला आहेस त्याची आतां पूर्तता कर. देवा, माझ्यावर कृपा कर. हे कैलासनाथा—डमरूधरा, माझ्या मित्राला—जिवाला राज्यपद देऊन राजा कर." अशी प्रार्थना करून शिवा उठला व तडक चालूं लागला. चालतां चालतां आणि मजल दरमजल करतां करतां दूरच्या देशांत गेला. गांवोगांवीं हिंडूं लागला. जेथें तेथें एका दयाळू राजाचा लौकिक त्याच्या कानीं पडूं लागला आणि हा राजा एकाएकीं कसा झाला त्याची गमतीदार हकीकत समजूं लागली. ज्याच्या त्याच्या तोंडीं ह्याच गोष्टी !

शिवा फिरत फिरत राजाच्या राजनगरीच्या वेशीवर आला. वेशीवरून नगरांत जाऊं लागला, तों शिवाला—त्या साधूला—वेशीवरील पहारेकऱ्यांनीं अडविलें.

शिवा त्या पहारेकऱ्यांना अगदीं काकुळतीनें सांगत होता, " मला महाराजांची भेट घ्यायची आहे. मला आंत जाऊं द्या. "

" छे, मुळींच नाहीं. अरे तूं साधू, तुला रे राजाची भेट घेऊन काय करायचं आहे नि राजा तुझी रे कशाला भेट घेईल? तो तुझ्या ओळखीचा थोडाच आहे? नाहीं बाबा. आम्हीं तुला वेशींतून आंत सोडणार नाहीं. राजाचा आम्हांला तसा हुकूम आहे."

शिवा पहारेकऱ्यांची अधिकाधिक विनवणी करीत होता आणि पहारेकरी शिवाला अधिकाधिक कठोरतेनें बोलून विनवणी अमान्य करीत होते.

शिवा कां बरें राजाची भेट घेण्याची इच्छा करीत होता? राजा शिवाच्या ओळखीचा होता? का राजाजवळ शिवाला कांहीं मागावयाचें होतें?

शिवा साधूला वेशीवरील पहारेकऱ्यांनीं राजनगरींत जाऊं दिलें नाहीं.

शिवा आतां काय करणार? तो वेशीजवळच्या रस्त्याला लागून असलेल्या वडाच्या झाडाखालीं जाऊन बसला. त्यानें ती रात्र 'हा राजा कोण? माझा शिवा तर नसेल ना?' ह्या तर्ककुतर्कांत काढली. पाहूं या; रस्त्यानें जातांना केव्हां तरी दिसेलच. राजाचें दर्शन होईपर्यंत येथेंच राहावयाचें, असा शिवानें निश्चय केला आणि तो राजाच्या दर्शनाची वाट पाहात राहिला.

पण शिवाला पाहिजे ती वेळ लवकरच आली.

राजा संध्याकाळीं उघड्या रथांत बसून शहराबाहेर फिरावयास जातांना शिवानें त्याला पाहिलें आणि शिवाचा चेहेरा आनंदित झाला.

दररोज संध्याकाळीं ठराविक वेळीं राजाचा रथ जातांना शिवाला राजाचें दर्शन घडे.

एक दोन वेळां तर राजाला हाक मारण्याचा मोह शिवाला झाला; पण त्यानें तो मोठ्या प्रयासानें आवरला.

तिसऱ्या वेळीं मात्र शिवाला तो मोह आवरतां आला नाहीं. त्यानें हाक मारलीच, " जिवा."

राजानें आपला रथ चटकन् उभा केला. त्यानें शिवा साधूकडे पाहिलें—टक लावून पाहिलें आणि मग राजा झटकन् रथांतून उतरला. शिवा साधूकडे गेला.


शिवा राजाकडे आणि राजा शिवाकडे क्षण दोन क्षण पाहात राहिले आणि मग ' जिवा-शिवा ' असे दोघांच्या तोंडून एकदम शब्द निघाले व दोघांनींही एकमेकांना घट्ट मिठी मारली! दोघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रु गळूं लागले.

पहिला बहर ओसरल्यावर जिवाचें—राजाचें आणि शिवाचें कांहीं बोलणें झालें. त्या बोलण्यावरून आपण राजा कसा झालों हें जिवाला समजलें असावें असें वाटतें.

शिवा आणि राजा रथांत बसले व राजवाड्यांत आले. राजानें शिवा साधूला आपल्या खास महालांत नेलें.

आतां शिवा साधू नेहमीं राजाबरोबर भोजन करतो. देवडीवरील एका चबुतऱ्यावर बसतो आणि एकतारी घेऊन कैलासनाथाची स्तुति करीत असतो.

राजा आणि साधू ह्यांचें नातें काय असावें ह्याचा राजवाड्यांतील, राजनगरींतील, राज्यांतील अनेक लोक अनेक तर्क करतात; पण अद्याप कोणालाच कांहीं उलगडा होत नाहीं.



# मीरादेवी

मीरा आणि प्रताप ह्या भावंडांसारखीं प्रेमळ भावंडें क्वचितच असतील. मीरा प्रतापवर अतिशय प्रेम करी आणि प्रतापही मीरावर तसेंच प्रेम करी. प्रतापचा पाय दुखूं लागला तर त्याचा परिणाम मीराच्या डोक्यावर होई व प्रतापला थोडा त्रास पडला तर त्याचा परिणाम मीराच्या चेहेऱ्यावर दिसे. प्रतापलाही मीराबद्दल तसेंच वाटे.

दोन्ही भावंडें लहान असतांनाच त्यांची आई ह्या जगांत त्यांना सोडून गेली होती. बापानें—महादबानें त्यांचें पालन-पोषण करून त्यांना वाढविलीं आणि मीरा—प्रतापला शक्य तितकें चांगलें वळण लावून तोही आतां ह्या जगांतून कायमचा निघून गेला होता.

प्रताप गांवांत मोलमजुरी करी आणि मीरा त्याला कोंड्याचा मांडा करून घाली. मीरा भावाबरोबर—प्रतापबरोबर मोलमजुरीला जाण्यास तयार होई, पण प्रताप तिला तसें करूं देत नसे. तो म्हणे, “मीरा, तुझा प्रताप अर्धपोटीं राहील, पण तो जिवंत असेपर्यंत तुला दुसऱ्याच्या दारीं मोलमजुरीला पाठवणार नाहीं.”

त्यावर मीरा म्हणे, “ दादा, तूं रे किती एकटा काम करणार? मीं थोडी—फार मदत केली तर नाहीं का चालायचं?

तुला एकट्यालाच त्रास. मी आपली ऐटींत घरीं बसून आयत्या पिठावर रेघोट्या ओढायला!"

अशा प्रकारें हीं प्रेमळ भावंडें आनंदपूर गांवांतील आपल्या पडक्या–झडक्या घरांत राहात आणि आलेला दिवस सोन्याचा करीत. कोंड्याचा मांडा करून खात.

मीरा–प्रतापचे दिवस अत्यंत आनंदांत चालले होते.

एक दिवस संध्याकाळचें जेवण झालें. मीरा–प्रताप अंगणांत शुभ्र चांदण्यांत बसलीं. इकडच्या तिकडच्या गप्पा मारूं लागलीं. गप्पा मारतां मारतां मध्येंच प्रतापनें चेहेरा गंभीर केला. तो थोडा वेळ गप्प राहिला व मग मीराला म्हणाला, "मीरा, आपल्या देशाची लढाई चालली आहे. लढाईला तरुणांची खूपच जरुरी आहे. लढाईवर गेलं, पराक्रम गाजवला, शत्रूवर जय मिळवला तर ज्या भूमींत–ज्या देशांत आपण जन्म घेतला त्या भूमीचे, त्या देशाचे पांग फेडलेसे होतील, नाहीं का? तो दामूशेट म्हणत होता, 'तुमच्यासारख्या तरण्या पोरांनीं आपल्या देशाला मदत केली पाहिजे. त्याची भरभराट होण्यासाठीं झटलं पाहिजे. त्याच्या उन्नतीकरितां स्वतःचं रक्त सांडण्याची पाळी आली तरी तें आनंदानें सांडलं पाहिजे.' नि काय म्हणाला तो, तर 'स्वदेश म्हणजे आपली माताच. मातेचं दुःख तेंच आपलं दुःख. मातेचा छळ तोच आपला छळ. मातेवर जुलूम तोच आपणावर जुलूम. मातेचा शत्रु तोच आपला शत्रु' असं तो म्हणाला. मग मीरा, जाऊं का मी लढाईवर?"

त्यावर मीरा काकुळतीनें म्हणाली, “ नको रे दादा आपणाला ती लढाई नि बिढाई. तूं लढाईवर जाऊं नकोस. तूं जाशील नि मी रे एकटी इथें कशी राहूं ? दादा, तूं लढाईवर नको जाऊंस. ”

अशा प्रकारचें मीरा–प्रतापचें बोलणें होऊन तीं झोपीं गेलीं.

एक दोन दिवस निघून गेले.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं नेहमींप्रमाणें मीरा झोपून उठली तों तिला काय दिसलें ? तर प्रताप कोठेंच नाहीं !

मीराला अतिशय दुःख झालें. ती रडूं लागली. आतां काय करावें हें तिला सुचेना. ‘माझा प्रतापदादा गेला. मला टाकून गेला. दादा, कां रे तूं असं केलंस ? मीं तुला दुःख दिलं का ? तुझ्याबरोबर भांडलें का ? तुला अपशब्द बोललें ? ’ अशा प्रकारचे नाना विचार करून मीरा रडत असे. पण तिचा दादा थोडाच परत येणार ? तो कोठें गेला आणि...

मीरा बिचारी एकटीच घरीं !

मीरा चार घरचीं चार कामें करी आणि आपला निर्वाह करी.

मीराला प्रतापची आठवण येई. रिकाम्या वेळीं तर तिला प्रताप डोळ्यांसमोर दिसे, म्हणून ती रिकाम्या वेळीं तुळशीची भक्ति करी. तिनें मोठ्या हौसेनें तुळशीचें रोपटें अंगणांत लाविलें होतें. मीरा त्या तुळशीला नियमित पाणी घाली. फुलें वाही. फुलांच्या माळा करून घाली. सांजवात लावी. तिच्या पुढ्यांत बसून अभंग म्हणे. तुळशीमाहात्म्य म्हणे. तिला तें पाठ येत होतें.

मीराची खरी सखी तुळस. मीराची खरी बहीण तुळस. खरी सोबतीण तुळस. खरी आई तुळस. मीरा तुळशीला विचारी,

"तुळशीमाई, माझा दादा कुठें ग गेला असेल? तुळशीमाई, माझा दादा खुशाल असेल ना ग? माझा दादा लढाईवर गेला असेल का ग? माझा दादा परत येईल का ग?"

अशा सारखे कितीतरी प्रश्न मीरा तुळशीमाईला विचारी व त्या प्रश्नांचीं उत्तरें आपणच देऊन समाधान मानी.

असे दिवस चालले होते.

आतां लढाई संपून गेली होती. गांवोगांवचे लोक लढाईवरून आपल्या बहीण-भावांना, आई-बापांना, आप्तेष्टांना, मित्र-मैत्रिणींना भेटावयास आले. पण मीराचा दादा आला नाहीं. मीराला आजपर्यंत वाटत होतें, माझा दादा-लढाईवरच गेला आहे. अगदीं नक्की! तिनें लढाईवरून आलेल्या कांहीं लोकांना विचारलेंही, "माझा दादा कुणाला दिसला का?" पण लोकांकडून तिला नकारच मिळाला.

आतां मात्र तिची खात्री होऊन चुकली कीं आपला दादा लढाईवर गेलेलाच नाहीं.

पूर्वीपेक्षां आतां मीराला अतिशयच वाईट वाटलें. दुःख झालें. तिच्या मनांत नाना विचार येऊं लागले. तिची अगदींच निराशा झाली. आणि...

एक दिवस तिनें आपला बेत नक्की केला.

त्या दिवशीं अगदीं काळोखी रात्र. अंधाराचें साम्राज्य. जणूं काय काळें कापडच सर्व दिशांना पसरलेलें आहे. सारीं माणसें झोपलेलीं. पण मीरा? मीरा उठली. तिनें खुंटीवर ठेवलेली एकतारी घेतली. कांहीं कपडे घेतले. नंतर ती अंगणांत तुळशीजवळ

गेली. तिनें तुळशीमातेला नमस्कार केला. डबडबलेल्या डोळ्यांनीं तुळशीकडे पाहिलें. ती तुळशीला का विचारीत होती, "आई, माझा दादा कुठें असेल? तो मला भेटेल का? मी त्याला भेटायला जाऊं का? आई, उद्यां तुला कोण ग पाणी देईल? तुझ्यापुढें संध्याकाळीं दिवा लावून 'दिव्या दिव्या दीपत्कार' कोण म्हणेल? आई, तुझी लेक चालली. दूर दूर चालली. कुठें वाट फुटेल तिकडे चालली. आतां तिच कोण आहे?"

'तुळशीआई, जातें हं!' असें दाटलेल्या गळ्यानें म्हणून व डबडबलेल्या डोळ्यांनीं तिच्याकडे पाहून मीरा निघाली. गांव सोडून दूर दूर गेली.

मीरा गेल्यावर आजच आठ दिवस झाले. आजच प्रताप घोड्यावर बसून मीराला भेटण्यासाठीं घरीं आला. त्यानें दुरूनच 'मीरा' अशी हाक मारली. त्याला वाटत होतें, माझी मीरा अंगणांत येईल. मला पाहून तिला किती तरी आनंद होईल.

'अरे, पण मीरा कां बरं अंगणांत आली नाहीं? रागावली तर नसेल माझ्यावर?' असा विचार करीत करीत प्रताप अंगणांत आला. घरांत गेला. मीरा त्याला कोठेंच दिसेना. त्यानें शेजाऱ्यापाजाऱ्यांना विचारलें, पण त्याला शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून कांहींच समजलें नाहीं.

मीरा नाहीं म्हणून प्रतापला अतिशय दुःख झालें. त्याच्या मनांत भलभलते विचार आले. पण करणार काय बिचारा? तो डबडबलेल्या डोळ्यांनीं घराकडे पाहात पाहात घोड्यावर बसून निघून गेला.

मीराचा प्रतापनें शोध केला, पण मीराबद्दल कांहींच शोध लागला नाहीं. तर मग मीरा गेली कोठें?

मीरा कोठल्या तरी गांवीं, कोठल्या तरी झाडाखालीं, नाहीं तर कोठल्या तरी देवळांत असे आणि वाट मिळेल त्या वाटेनें पुढें पुढें जात असे. जातांना ती एकतारीवर अभंग म्हणे. तिच्या गोड गळ्यांतून निघणाऱ्या गोड अभंगांवर लोक खूश होत. मीराला अन्न देत. वस्त्र देत. तिची विचारपूस करीत. पण तिला कोणीही अपशब्द बोलत नसत कीं दुःख देत नसत.

मीरा गळ्यानें गोड होती तशी रूपानेंही सुंदर होती. कृष्ण-कमळासारखे डोळे तिच्या गोल चेहेऱ्यावर इतके शोभून दिसत कीं त्यांना कशाचीच उपमा देतां येणार नाहीं! मीराचे हे डोळेच मीराचें रक्षण करीत असत. तिच्या दृष्टीला दृष्टि लावून पाहाण्याचें धैर्य कोणालाही होत नसे. हें मीराच्या डोळ्यांमुळेंच! तिला अपशब्द बोलण्याची कोणाला छाती होत नसे ती ह्या तिच्या पाणीदार डोळ्यांमुळेंच! मीराचे पाणीदार डोळेच ह्या अफाट नगरांत मीराचें रक्षण करीत होते.

जातां जातां मीरा एका मोठ्या नगरांत गेली. त्या नगरांत मीराच्या ओळखीचें कोणी नाहीं. मीराच्या मायेचें कोणी नाहीं. तिनें आपल्या सोळा वर्षांच्या आयुष्यांत आजच एवढें मोठें नगर पाहिलें.

मीराला काळजी उत्पन्न झाली. ह्या नगरांत आश्रयाचें ठिकाण कोठें?



तें पाहा देऊळ. कोणीं आश्रय दिला नाहीं तरी देव सर्वांनाच आश्रय देतो. कोणीं ममतेनें पाहिलें नाहीं तरी देव सर्वांकडेच ममतेनें पाहातो.

मीरा देवाच्या दारीं—देवळांत आश्रयाला गेली. ती देवळाच्या दारांत गेली. तिनें देवाला नमस्कार केला. मग ती देवळाच्या एका कोपऱ्यांत जाऊन बसली. तिनें सारा संकोच सोडला. मनांतल्या मनांत तुळशी-मातेचें स्मरण केलें आणि ती गोड गोड अभंग म्हणूं लागली.

मीराला ठराविक तीनचारच अभंग येत होते. पणजोबा-आजोबा–वडील अशा एकमेकांच्या तोंडून पाठ होत होत ते मीराच्या तोंडीं आले होते.

मीराच्या तोंडचे हे रसाळ अभंग ऐकण्यासाठीं लोकांचे थवेच्या थवे चित्रासारखे तटस्थ राहात असत. अभंग ऐकत असत. दिडकी दुगाणी टाकीत असत आणि निघून जात असत.

एकदा तर राजपुत्र सुद्धा उभा राहिला तिचे ते अभंग ऐकायला! मग तो इतका आनंदित झाला कीं सांगून समजणार नाहीं.

पुढें पुढें तर राजपुत्र घोड्यावरून दररोज देवळाजवळ यावयाचा, थोडा वेळ मीराचे गोड गोड अभंग ऐकावयाचा व निघून जावयाचा. बिचाऱ्या मीराला काय माहीत, राजपुत्र गोड अभंग ऐकावयास येतो तो?

राजपुत्राचा असा क्रम बरेच दिवस चालला होता. पण...

आज राजपुत्र आला नाहीं. कां बरें आला नाहीं?

मीराला आज अगदीं चुकल्या चुकल्यासारखें झालें. तिला चैन पडेना. कुणाला तरी विचारावं घोड्यावरून येणारा तो तरुण कां आला नाहीं? हूं, नको! कशाला विचारा? त्या तरुणाची नि [illegible] थोडीच ओळख आहे?

हो. तरी पण आज कां बरं आला नाहीं? नाहीं का येईना!

असा विचार करतां करतां दोन दिवस निघून गेले आणि तिसऱ्या दिवशीं एक राजदूत घोड्यावरून देवळाजवळ आला.

मीरा अभंगांत दंग झाली होती. लोक ऐकत होते. इतक्यांत राजदूतानें जेव्हां मीराला अभंग म्हणण्याचें बंद केलें व आपल्याबरोबर राजवाड्यांत येण्यास सांगितलें, तेव्हां लोकांना नवल वाटलें. मीरालाही आश्चर्य वाटलें. थोडी भीतीही वाटली. तिनें राजवाड्यांत जाण्याविषयीं नकार दर्शविला, पण शेवटीं होकार दर्शवून तिला राजवाड्यांत जाणें भागच पडलें.

मीरा भीत भीत राजदूताबरोबर राजवाड्यांत गेली. एका भव्य दालनांत गेली. तेथें मीराला काय दिसलें, तर घोड्यावरून देवळाजवळ येऊन गाणें ऐकणारा तो तरुण मुलगा एका पलंगावर झोपलेला असून पलंगाशेजारीं पंचवीस तीस माणसें आहेत!

आहे काय हें? मीराला कांहींच समजेना!

मीरा एका कोपऱ्यांत उभी राहिली. तिच्याकडे कोणाचें लक्षच नव्हतें. थोडा वेळ असाच गेला. शेवटीं जेव्हां राजदूतानें मीराला आणल्याची वर्दी राजाला दिली तेव्हां राजाचें लक्ष मीराकडे गेलें. मग राजा मीराकडे निरखून पाहात म्हणाला, “ तूंच का एकतारीवर



गातेस? बरं तर, आमचा हा पुत्र थोडा आजारी आहे. त्याची करमणूक व्हावी म्हणून तूं इथें बसून तुझीं गाणीं म्हणत जा. तुझं गाणं, तुझे अभंग ऐकण्याची इच्छा त्यानें दर्शविली म्हणून तुला [illegible] इथें बोलवून आणली. तुझी खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्यांची, राहाण्याची सारी व्यवस्था इथेंच होईल."

राजाची आज्ञा. राजाचा हुकूम!

म्हणून मीराला राजवाड्यांतच राहावें लागलें.

राजपुत्राला लहर लागली कीं तो मीराला अभंग म्हणावयास लावी. मीरा आनंदानें म्हणे. शक्य तितके सुरेख म्हणे. आणि म्हणूनच —

राजपुत्र मीरावर फार फार खूश झाला होता!

असे दहा पंधरा दिवस गेले आणि मग —

हळूहळू नगरांत बातमी उठली, ज्याच्या त्याच्या तोंडीं एकच, राजपुत्राचें लग्न! मीराबरोबर राजपुत्राचें लग्न!

ही बातमी अगदीं खरी होती. कारण —

राजनगरांत जिकडे तिकडे तोरणें दिसूं लागलीं. पताका फडकूं लागल्या. ठिकठिकाणच्या दरवाजांवर उभारलेल्या रंगीबेरंगी कमानी शोभूं लागल्या. लग्नाची सारी तयारी झाली.

आज राजपुत्राचें लग्न!

लग्नाला देशोदेशींचे राजे आले. मोठमोठे शेठ-सावकार आले. ठिकठिकाणचे अधिकारी आले. सरदार आले. लग्नमंडपांत आपापल्या जागांवर बसले.

तो पाहा एक सरदार. तो मीराकडे मघांपासून एकसारखा कां बरें पाहातो ? आणि मीराही त्याच्याकडे मघांपासून कां बरं पाहाते ? कोण बरं असावा तो ? अरे, तो सरदार तर आतां मीराजवळ आला. हें काय ?

त्या सरदारानें मीराला हाक मारली, " मीरा, मीरा. "

" प्रतापदादा, दादा. "

मीरा आणि प्रताप ! बहीण आणि भाऊ !

मीराला दादा आज कित्येक दिवसांनीं भेटला. बहिणीला भाऊ कित्येक दिवसांनीं भेटला !

लग्नाला जमलेल्या मंडळीला 'मीरा' आणि 'दादा' अशा एकमेकांच्या हाकेनें कांहींच समजेना. मंडळी अगदीं बुचकळ्यांत पडली. पण अशा स्थितींत त्यांना फार वेळ राहावें लागलें नाहीं. कारण....

प्रताप सांगूं लागला — मीराला एकटीलाच घरीं ठेवून देशाकरितां लढाईवर कसा आलों, लढाईवर खूपच खूप कसा पराक्रम केला, महाराज आपणावर कसे खूश झाले, त्यांनीं आपणाला सरदार कसा केला...वगैरे सारी हकीकत त्यानें सांगितली.

नंतर तो हसत हसत मीराला म्हणाला, " मीरा, नव्हे चुकलों, राजस्नुषा मीरादेवी, हा प्रतापराव सरदार तुझा नोकर. तुझा सरदार. "

मग मात्र साऱ्या लग्नमंडपांत हशा पिकला.

IRBK-0104050
IRBK-0104050